cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-११३ | सोमवार दि.१३ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### पण न्यायालयीन कसोटीवर सत्य कुठे?

२०१४ पासून भारतीय राजकारणात ''भ्रष्टाचार'' हा सर्वाधिक वापरला गेलेला राजकीय मुद्दा ठरला. विशेषतः काँग्रेस आणि गांधी कुटुंबावर करण्यात आलेले आरोप हे भाजपच्या राजकीय प्रचाराचा केंद्रबिंदू होते. निवडणूक सभांपासून संसदेपर्यंत आणि दूरचित्रवाणीवरील चर्चांपासून सोशल मीडियापर्यंत, ''भ्रष्टाचारमुक्त भारत'' या घोषणेसोबत गांधी कुटुंबाचे नाव सातत्याने जोडले गेले. मात्र, सत्तेतील जवळपास बारा वर्षांनंतर एक प्रश्न अनिवार्यपणे समोर येतोजर आरोप इतके गंभीर होते, तर आजपर्यंत गांधी कुटुंबाविरुद्ध भ्रष्टाचाराची अंतिम न्यायालयीन दोषसिद्धी का झालेली नाही?

# निकषांतील बदलामुळे कर्जमाफीचा खर्च ४० हजार कोटींवर

## लाभार्थ्यांची पडताळणी अंतिम टप्प्यात-कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

वालचंदनगर । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्यांना जुलै महिना संपण्यापूर्वीच कर्जमाफीचा लाभ देण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असून, आयकर भरणाऱ्या (करदाते) शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नसल्याची स्पष्ट माहिती राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी रविवारी दिली. कर्जमाफीच्या अंमलबजावणीत काहीसा विलंब झाला असला तरी निकषांमध्ये करण्यात आलेल्या बदलांमुळे अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळणार असल्याचा दावा त्यांनी केला.**

रविवारी (१२ जुलै) आपल्या निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधताना कृषीमंत्री भरणे यांनी कर्जमाफीबाबत सरकारची भूमिका स्पष्ट केली. कर्जमाफीसाठी सरकारकडून वारंवार नवीन तारखा जाहीर केल्या जात असल्याच्या प्रश्नावर उत्तर देताना ते म्हणाले की, राज्य सरकार शेतकरीहिताचा विचार करूनच निर्णय घेत आहे. सुरुवातीला ५ जुलैपर्यंत कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यासाठी पावसाळी अधिवेशनात २० हजार कोटी रुपयांच्या पुरवणी अर्थसंकल्पातून आवश्यक आर्थिक तरतूदही करण्यात आली होती. मात्र, दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीच्या निकषांमध्ये काही महत्त्वाचे बदल



करण्याचा निर्णय घेतला. या बदलांमुळे योजना अधिक स्पष्ट आणि व्यापक झाली असल्याचे भरणे यांनी सांगितले. २०१९ मधील कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांनाही आता सरसकट दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्यात येणार आहे. याशिवाय नियमितपणे पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचाही निर्णय कायम ठेवण्यात आला आहे. तथापि, आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेतून वगळण्यात आल्याचे कृषीमंत्र्यांनी स्पष्ट केले. करदाते शेतकरी कोण आहेत, याची अधिकृत माहिती केंद्र सरकारकडून

▶▶ पान २ वर

# आ.रोहित पवार अडचणीत!

## • 'ईडी'नंतर आता आणखी एक नवी नोटीस

पुणे । प्रतिनिधी

**विधिमंडळ अधिवेशनादरम्यान सरकारला विविध प्रश्नांवर धारेवर धरणारे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार अडचणीत आले आहेत. त्यांना आधी सक्तवसुली संचालनालयाच्या म्हणजेच 'ईडी'च्या नोटिसीला सामोरे जावे लागले होते. आता आणखी एका नवीन नोटिसीचे शुक्लकाष्ठ त्यांच्या मागे लागले आहे.**

आमदार रोहित पवार यांना बारामती अ‍ॅग्रो आणि कथित करचुकवेगिरी प्रकरणी ईडीने आधी नोटीस बजावली होती. आता बारामती अ‍ॅग्रोच्या साखर कारखान्याला पर्यावरण नियमांचा भंग केल्याप्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नोटीस बजावली आहे. कारखान्यावर हवा आणि जलप्रदूषणाचा ठपका मंडळाने ठेवला आहे. या प्रकरणी उत्तर देण्यासाठी सात दिवसांचा कालावधी



कारखान्याला देण्यात आला आहे. यापुढील काळात मंडळाच्या वैध संमतीशिवाय कारखाना चालवू नये, असेही निर्देश देण्यात आले आहेत. बारामती अ‍ॅग्रोचा इंदापूर तालुक्यातील शेटफळगडे येथे साखर कारखाना आहे. या कारखान्यामुळे प्रदूषण होत असल्याची तक्रार शेटफळगडे येथील सागर वाबळे आणि छगन वाबळे या ग्रामस्थांनी

▶▶ पान २ वर

# महाराष्ट्र होणार रेल्वे फाटक मुक्त-देवेंद्र फडणवीस

नागपूर । प्रतिनिधी

**राज्यातील नागरिकांना सुरक्षित, कार्यक्षम आणि तंत्रज्ञानाधारित दळणवळण सुविधा उपलब्ध करून देतानाच रेल्वे फाटकाअभावी होणारे अपघात टाळण्यासाठी येत्या तीन वर्षांत १४५ रेल्वे उड्डाण पुलांच्या बांधकामांना प्राधान्य देण्यात येत आहे. यामुळे महाराष्ट्र रेल्वे फाटकमुक्त करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.**



वर्धमाननगर येथे रेल्वे क्रॉसिंगवर चार पदरी रस्ता उड्डाण पूल तसेच राज्यातील ४८४ कोटी रुपयांच्या ९ महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांचे लोकार्पण देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, चंद्रशेखर बावनकुळे व मान्यवर उपस्थित होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले, रेल्वे फाटकाअभावी दरवर्षी २१ हजार लोकांचा मृत्यू होत असल्यामुळे रेल्वे फाटकमुक्त महाराष्ट्र करण्याला प्राधान्य देण्यात येत आहे. राज्यात ५२४ रेल्वे फाटकांची आवश्यकता असून, त्यापैकी १० हजारपेक्षा जास्त दळणवळण असलेल्या १२१ फाटकांसोबतच इतरही १४५ रेल्वेवरील पुलांच्या बांधकामांना मान्यता देण्यात आली आहे. हे काम येत्या तीन वर्षांत महारेलतर्फे

▶▶ पान २ वर

# संसदेच्या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारने बोलावली सर्वपक्षीय बैठक

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

संसदेचे पावसाळी अधिवेशन येत्या २० जुलैपासून सुरू होत आहे. त्यापूर्वी केंद्र सरकारने १९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संसदेचे कामकाज सुरळीत आणि फलदायी पद्धतीने पार पडावे, यासाठी ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

माहितीनुसार, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होईल. बैठकीला विविध राजकीय पक्षांचे नेते उपस्थित राहणार असून, अधिवेशनातील कामकाज आणि इतर महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे. अधिवेशनादरम्यान संसदेचे कामकाज विनाअडथळा पार पडावे, यासाठी विरोधी पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहन सरकारकडून या बैठकीत करण्यात येणार आहे. तसेच विरोधी पक्षांनाही अधिवेशनात उपस्थित करावयाच्या मुद्द्यांबाबत आपली


▶▶ पान २ वर

# दिड महिन्यात ७० वेळा चोरी

## राम मंदिरातील दान अपहार प्रकरणाची धक्कादायक माहिती समोर

अयोध्या । वृत्तसंस्था

**अयोध्येतील राम मंदिरातील दानपेटीतील चोरी ही एखादी-दुसरी घटना नव्हती. पोलिसांच्या चौकशीत समोर आलेल्या माहितीनुसार, अवघ्या ४० दिवसांत देणग्यांतील रक्कम तब्बल ७० वेळा कथितपणे चोरली गेली. इतकेच नव्हे, तर काही दिवशी एकाच दिवशी तीन-तीन वेळा चोरी झाल्याचेही उघड झाले आहे. या धक्कादायक खुलाशानंतर मंदिर प्रशासनाने दानपेटीतील रकमेची मोजणी करण्याची संपूर्ण व्यवस्था बदलली आहे.**



राम मंदिरातील दानपेटी अपहार प्रकरणाच्या तपासादरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. पोलिसांच्या चौकशीत असे निष्पन्न झाले की, अवघ्या ४० दिवसांत कथितपणे ७० वेळा दानपेटीतील रक्कम काढण्यात आली. या तपासानंतर मंदिर प्रशासनाने दानरकमेच्या मोजणीची पद्धत बदलली

▶▶ पान २ वर

# गोशाळा अनुदानात ३५० कोटींचा भ्रष्टाचार; राऊतांचा गंभीर आरोप



मुंबई । प्रतिनिधी

धर्माच्या नावाखाली भाजपकडून लूट सुरू आहे. राजस्थानमध्ये गोशाळांच्या अनुदानात ३५० कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे. मृत गाईंवर यांनी अनुदान घेतले. मृत गोमातेच्या टाळूवरचे लोणी भाजपचे लोक खात आहेत, असा गंभीर आरोप करत, धर्माच्या नावाखाली लूट सुरू असताना सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरचिटणीस दत्तात्रय होसबाळे काय करत आहेत?'' असा सवाल ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज माध्यमांशी बोलताना केला.

▶▶ पान २ वर

# पावसाळी अधिवेशनात इंडिया आघाडी आक्रमक होणार!

## अनेक मुद्द्यांवरून सरकारला घेरत कोंडी करण्याची रणनिती

दिल्ली । वृत्तसंस्था

आगामी २० जुलै ते १३ ऑगस्ट दरम्यान होणाऱ्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधी पक्षांची इंडिया आघाडी केंद्र सरकारला विविध मुद्द्यांवरून धारेवर धरण्यासाठी सज्ज झाली आहे. अयोध्येतील राम मंदिर देणगी गैरव्यवहार प्रकरण, नीट वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील पेपरफुटी,

▶▶ पान २ वर




# अंबाजोगाई तालुक्यात खून!

## भररस्त्यात तीक्ष्ण हत्याराने वार करुन तरुणाला संपवले

आंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील घाटनांदूर येथील अण्णाभाऊ साठे चौकात शनिवारी रात्री एका तेवीस वर्षीय तरुणाची तीक्ष्ण हत्यारे आणि दगडाने ठेचून निर्घृण हत्या करण्यात आल्याची भयानक घटना उघडकीस आली आहे. ज्ञानेश्वर वाकडे (वय २३, रा. पट्टीवडगाव) असे या मृत तरुणाचे नाव असून या जीवघेण्या हल्ल्यात त्याचा मित्र गंभीर जखमी झाला आहे. भररस्त्यात घडलेल्या या रक्तरंजित

▶▶ पान २ वर



## थोडक्यात...

### अमरनाथमध्ये यंदा बाबा बर्फानी ५ दिवसांतच अदृश्य

दिल्ली : यंदाच्या अमरनाथ यात्रेत बाबा बर्फानींचे नैसर्गिक शिवलिंग अवघे ५ दिवसच दर्शनासाठी उपलब्ध राहिले. दरवर्षी दर्शनाचे दिवस कमी होत असून शिवलिंग लवकर वितळत असल्याने भाविकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. यामागे हवामान बदल, वाढती गर्दी, विकासकामे की आणखी काही कारणे आहेत. पूर्वी बाबा बर्फानींचे दर्शन तब्बल ५७ दिवस होत असे. त्यानंतर हा कालावधी ३८ दिवस, २८ दिवस, ७ दिवस आणि आता फक्त ५ दिवसांवर आला आहे. हा केवळ आकडा नाही, तर दरवर्षी कमी होत चाललेल्या दर्शनाच्या कालावधीमुळे भाविकांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. पुढच्या काळात हा आकडा शून्यावर तर जाणार नाही ना, अशी चिंता अनेकांना सतावत आहे. ७ जुलै २०२६ रोजी हजारो भाविक ''बम भोले''च्या जयघोषात अमरनाथ गुहेत पोहोचले. मात्र, आतले दृश्य पाहून सर्वजण स्तब्ध झाले. ज्या ठिकाणी बाबा बर्फानींचे शिवलिंग असते, तेथे फक्त ओला दगड दिसत होता.

### स्विगी इन्स्टामार्टला सरकारकडून नोटीस

नवी दिल्लीः ऑनलाइन किराणा आणि झटपट वितरण सेवा देणाऱ्या स्विगी इन्स्टामार्टला अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने तब्बल ९ नोटिसा बजावल्या आहेत. ग्राहकांकडून कालबा, खराब, कुजलेले आणि खाण्यास अयोग्य अन्नपदार्थ वितरित केल्याच्या तक्रारी आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. एफएसएसएआयने स्विगी इन्स्टामार्टकडे या प्रकरणी सविस्तर खुलासा आणि नियमांचे पालन केल्याचा अहवाल मागवला आहे. समाधानकारक उत्तर न दिल्यास अन्न सुरक्षा आणि मानक कायदा, २००६ अंतर्गत कारवाई करण्यात येईल असा इशाराही प्राधिकरणाने दिला आहे. एफएसएसएआयच्या नोटिसांनुसार, ग्राहकांनी स्विगी इन्स्टामार्टमार्फत कालबा, खराब, कुजलेले आणि दूषित अन्नपदार्थ मिळाल्याच्या तक्रारी केल्या आहेत. यामध्ये हेल्थिफाय १००% व्हे प्रोटीन, शेंगदाणे असलेले नॉइस होमस्टाईल मद्रास मिक्सचर, अक्षयकल्प ऑरगॅनिक अंडी आणि काक्के दा पराठा या उत्पादनांचा समावेश आहे.

### बंगालच्या उपसागरात ४.५ रिश्टर स्केलचा भूकंप

कोलकाताः बंगालच्या उपसागरात रविवारी सकाळी भूकंप झाला. आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणममध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाच्या धक्क्याने विशाखापट्टणममधील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण होते. इंडियन नॅशनल सेंटर फॉर ओशन इन्फॉर्मेशन सर्व्हिसेसनुसार, बंगालच्या उपसागरात ४.५ तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार, सकाळी ५ वाजून ५ मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाचे केंद्र बंगालच्या उपसागरात काकीनाडा किना-यापासून सुमारे २२५ किलोमीटर अंतरावर १० किलोमीटर खोलीवर होते. सुदैवाने, यात कोणतीही हानी झाल्याचे वृत्त नाही. शहरातील कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाले नाही, मात्र रहिवाशांमध्ये घबराट पसरली नाही. भूकंप सौम्य तीव्रतेचा असला तरी, स्थानिक प्रशासनाने रहिवाशांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. भूकंपाच्या धक्क्यानंतर त्सुनामी किंवा इतर कोणत्याही मोठ्या धोक्याची तात्काळ शक्यता नाही.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ जुलै २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६३.०० क्विंटल | २,४४० | २,८४१ | २,६६४ |
| ज्वारी/हायब्रिड: १७१.०० क्विंटल | २,३०० | ४,१०० | २,९९३ |
| मका/लोकल: ३९.५० क्विंटल | २,००० | २,२४९ | २,१२४ |
| तूर : १३.५० क्विंटल | ७,५५१ | ७,५५१ | ७,५५१ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १६४.५० क्विंटल | २,४०० | ३,५११ | २,७९३ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,०३१ | ६,०३१ | ६,०३१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: २२.५० क्विंटल | ५,५९० | ६,१०० | ५,७९६ |

# बीड पोलिसांच्या नव्या प्रणालीद्वारे तपास प्रक्रियेत क्रांती

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र पोलीस दलाच्या तपास प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा आधुनिक वापर करत, बीड पोलिसांनी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. देशातील पहिली एंड टू एंड ए आय आधारित पोलिसिंग आणि तपास कार्याला गती अशी यंत्रणा असलेल्या ऊशशएिूश अख' या प्रकल्पाची राज्यस्तरीय तांत्रिक व तपासविषयक पाहणी बीड शहर पोलीस ठाण्यात यशस्वीरित्या संपन्न झाली आहे. गुन्ह्यांची नोंदणी ते न्यायालयीन खटल्याचे निरीक्षण या संपूर्ण प्रक्रियेला या प्रणालीमुळे गती आणि अचूकता मिळणार आहे. केवळ एफआयआर नव्हे, तर तपासाच्या पुढील टप्प्यांवरही





ही प्रणाली तपासी अधिकाऱ्याला दिशा देते. हे बीड पोलिसांचे मोठे यश मानले जात आहे. वरिष्ठ अधिकारी आणि तांत्रीक शाखेने याचे परिक्षण केले आणि त्यास मान्यात मिळाली तर बीड पोलिसांची हे मोठे यश असणार आहे.

या तंत्रामध्ये पंचनामे तयार करणे, वैद्यकीय अहवाल विश्लेषण, साक्षीदारांचे जबाब नोंदवणे आणि पुरावे ते पक्की ओळख यामुळे तपास अधिक दर्जेदार होतो. केस डायरी आणि आरोपपत्र तयार करण्यापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी यावर घटना, पंचनामा त्यावरील कलमपर्यंत सर्व सुविधा एकाच प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत. सीसीटीव्ही फुटेजमधील व्यक्ती व वाहनांची ओळख पटवणे, तसेच सिडीआर विश्लेषणाद्वारे गुन्हेगारी पॅटर्न शोधणे यामुळे गुन्हेगारांपर्यंत पोहोचणे सोपे होणार आहे. गुन्हेगारीवर वचक, भविष्यातील दिशादर्शकया प्रणालीमध्ये २०१७ पासूनचे सर्व एफआयआर आणि ८०० हून अधिक आरोपपत्रे समाविष्ट केली आहेत. यामुळे गुन्हेगारांचा पूर्वइतिहास तपासणे, संघटित गुन्हेगारीवर कारवाई करणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अधिक प्रभावी झाले आहे. या प्रकल्पाचे मूल्यमापन करण्यासाठी आलेल्या तज्ज्ञ समितीने

▶▶ पान २ वर

### तज्ज्ञ समितीकडून कौतुक!

या प्रकल्पाचे मूल्यमापन करण्यासाठी राजीव सक्सेना, महेश भार्गवा आणि प्रा. प्रणव गोयल यांची तज्ज्ञ समिती बीडमध्ये उपस्थित होती. त्यांनी या प्रणालीच्या तांत्रिक क्षमता आणि तपासविषयक उपयुक्ततेचे विशेष कौतुक केले. पोलीस उप-महानिरीक्षक जी. श्रीधर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी हा प्रकल्प राबविला आहे.

### ३-४ तासांचे काम अवघ्या ३-४ मिनिटांत!

पारंपरिक पद्धतीने गुंतागुंतीच्या गुन्ह्यांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अनेकदा ३ ते ४ तासांचा कालावधी लागतो. मात्र, ऊशशएिूश अख' च्या माध्यमातून हा मसुदा अवघ्या ३ ते ४ मिनिटांत तयार करणे शक्य झाले आहे. ही प्रणाली स्पीच टू टेक्स आणि ओसीआर सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून माहितीचे विश्लेषण करते, तसेच गुन्ह्याच्या स्वरूपानुसार संबंधित कलमे सुचवते.

cmyk

अग्रलेख

# आरोपांची राजकीय धार, पण न्यायालयीन कसोटीवर सत्य कुठे उभे आहे?

२०१४ पासून भारतीय राजकारणात ''भ्रष्टाचार'' हा सर्वाधिक वापरला गेलेला राजकीय मुद्दा ठरला. विशेषतः काँग्रेस आणि गांधी कुटुंबावर करण्यात आलेले आरोप हे भाजपच्या राजकीय प्रचाराचा केंद्रबिंदू होते. निवडणूक सभांपासून संसदेपर्यंत आणि दूरचित्रवाणीवरील चर्चांपासून सोशल मीडियापर्यंत, ''भ्रष्टाचारमुक्त भारत'' या घोषणेसोबत गांधी कुटुंबाचे नाव सातत्याने जोडले गेले. मात्र, सत्तेतील जवळपास बारा वर्षांनंतर एक प्रश्न अनिवार्यपणे समोर येतोजर आरोप इतके गंभीर होते, तर आजपर्यंत गांधी कुटुंबाविरुद्ध भ्रष्टाचाराची अंतिम न्यायालयीन दोषसिद्धी का झालेली नाही?

हा प्रश्न विचारणे म्हणजे गांधी कुटुंबाला निर्दोष घोषित करणे नाही. त्याचप्रमाणे आरोप झाले म्हणून त्यांना दोषी ठरवणेही योग्य नाही. लोकशाहीत आरोप, तपास आणि न्यायालयीन दोषसिद्धी या तीन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. दुर्दैवाने भारतीय राजकारणात हा मूलभूत फरक अनेकदा जाणीवपूर्वक पुसला जातो. २०१४ नंतर अंमलबजावणी संचालनालय, केंद्रीय अन्वेषण विभाग आणि आयकर विभागाने अनेक चर्चित प्रकरणांचा तपास पुढे नेला. नॅशनल हेराल्ड, अगस्ता वेस्टलँड, विविध आर्थिक व्यवहार आणि इतर प्रकरणांमध्ये चौकशी झाली, समन्स बजावण्यात आले, मालमत्ता जप्त करण्यात आल्या आणि न्यायालयीन प्रक्रिया सुरू झाली. परंतु आजची वस्तुस्थिती अशी आहे की, या प्रकरणांपैकी अनेक न्यायालयात प्रलंबित आहेत आणि गांधी कुटुंबाविरुद्ध भ्रष्टाचाराची अंतिम दोषसिद्धी झालेली नाही. हा एक वस्तुनिष्ठ आणि पडताळता येणारा तथ्यात्मक मुद्दा आहे. याचा अर्थ आरोप खोटे होते का? आवश्यक नाही. याचा अर्थ गांधी कुटुंब निर्दोष आहे का? तो निष्कर्ष काढण्याचाही अधिकार कोणालाच नाही. याचा अर्थ इतकाच की न्यायालयाने अद्याप अंतिम निर्णय दिलेला नाही, मग इतकी वर्षे झाली तरी निकाल का लागला नाही? याची अनेक कारणे असू शकतात. न्यायालयीन प्रक्रियेतील विलंब, आर्थिक गुन्ह्यांमधील गुंतागुंतीचे पुरावे, तपासातील मर्यादा किंवा न्यायालयीन कसोटीवर पुरावे सिद्ध करण्यात येणाऱ्या अडचणी. या सर्व शक्यता स्वतंत्रपणे तपासल्या जाऊ शकतात. पण एक गोष्ट स्पष्ट आहेराजकीय भाषणातील आरोप आणि न्यायालयातील पुरावे यांच्यात मोठी दरी असते. याच ठिकाणी दुसरा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. जर तपास यंत्रणांकडे व्यापक अधिकार, आर्थिक व्यवहारांची माहिती, जप्तीची शक्ती आणि अनेक वर्षांचा कालावधी उपलब्ध असेल, तर अंतिम दोषसिद्धीपर्यंत पोहोचण्यात विलंब का होत आहे? हा प्रश्न केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित नाही; तो भारतातील तपास यंत्रणांच्या कार्यक्षमतेबद्दल आणि न्यायव्यवस्थेच्या गतीबद्दलही आहे. दरम्यान, विरोधक सातत्याने आरोप करतात की केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर राजकीय दबावाचे साधन म्हणून केला जातो. दुसरीकडे केंद्र सरकार आणि भाजपचे म्हणणे आहे की भ्रष्टाचाराविरुद्ध कारवाई करताना कोणालाही सूट दिली जात नाही. या दोन्ही दाव्यांपैकी कोणता खरा आहे, याचा अंतिम निर्णय राजकीय व्यासपीठावर नव्हे तर न्यायालयातच होणार आहे.

लोकशाहीत तपास यंत्रणांवरील विश्वास हा त्यांच्या कारवाईच्या संख्येवर नव्हे, तर न्यायालयात टिकणाऱ्या गुणवत्तापूर्ण तपासावर अवलंबून असतो. केवळ छापे, समन्स किंवा आरोपपत्रे ही भ्रष्टाचार सिद्ध झाल्याची हमी नसते. त्याचप्रमाणे दोषसिद्धी न झाल्यामुळे सर्व आरोप आपोआप निराधार ठरत नाहीत. आज गरज आहे ती राजकीय घोषणांपेक्षा न्यायालयीन सत्याला महत्त्व देण्याची. कारण लोकशाहीत कोणत्याही व्यक्तीला न्यायालय दोषी ठरवेपर्यंत तो कायद्याच्या दृष्टीने निर्दोष मानला जातो. हा केवळ गांधी कुटुंबासाठी नाही, तर प्रत्येक नागरिकासाठी लागू होणारा घटनात्मक सिद्धांत आहे. म्हणूनच आजचा मूलभूत प्रश्न व्यक्तींविषयी नाही, तर संस्थांविषयी आहे. तपास यंत्रणांची विश्वासार्हता त्यांच्या निष्पक्षतेतून सिद्ध होईल की राजकीय आरोपांमधून? भ्रष्टाचाराविरोधातील लढा हा निवडणुकीपुरता मर्यादित राहणार की न्यायालयीन कसोटीवरही तितकाच सक्षम ठरणार? या प्रश्नांची उत्तरे भारताच्या लोकशाहीचे भविष्य ठरवतील. कारण कोणत्याही लोकशाहीत राजकीय प्रचारापेक्षा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक महत्त्वाचा असतो, आणि अंतिम सत्य हे न्यायालयाच्या निर्णयातूनच समोर येते.




बीडः संभाजीनगर चे नगरसेवक तथा स्थायी समिती चे सभापती श्री. राजेंद्रजी वैद्य यांच्या मुलीच्या, राही राजेंद्र वैद्य व अक्षय रेणावीकर यांच्या शुभविवाह लग्नसोहळा निमित्त संभाजीनगर येथे भेट दिली. राज्यपाल नामदार श्री. हरीभाऊ नाना बागडे, मंत्री श्री. आतुलजी सावे साहेब, माजी केंद्रीय मंत्री श्री. भागवतराव कराड आमदार श्री. संजीव जैस्वाल, बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख श्री चंद्रकांत (आप्पा)नवले, श्री. कृष्णा वांगीकर, धनंजय काळे, प्रमोद वैद्य बीड जिल्हा शिवसेना संघटक श्री. विक्रमराजे भोसले माजी उपजिल्हाप्रमुख जयसिंग चुंगडे (मामा), पत्रकार संपादक राजेंद्र शहापुरकर, सतीश नागरे, पोलिस निरीक्षक अविनाश आघाव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# रस्त्याचे नामकरण करण्याऐवजी महामार्गाला नाव का दिले नाही–मा.आ.राजेंद्रजी जगताप

**बीड । प्रतिनिधी**

**काल बीड शहरामध्ये आदिशक्ती संत मुक्ताबाई पालखीचे स्वागत होत असतानाच साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यापासून हिरालाल चौकाकडे जाणाऱ्या रस्त्याचे नूतन नामकरण करण्याचा न. प. बीडचा निर्णय स्वागतार्ह मात्र काहीसा अनाकलनीय वाटला अशी प्रतिक्रिया माजी आमदार राजेंद्र जगताप यांनी दिली.**



**एका महापुरुषाचे नाव पुसून तिथं संताचे नाव आणण्याचे ''पांडित्यनीती'' चे नेमके ध्येय सामाजिक दुही निर्माण करणे आहे की काय अशी चर्चा बीड शहरात जोरदार पणे सुरु असून लोकं या प्रकरणाचे चवीने चर्वन करत आहेत.**

सदर निर्णयाच्या बाबतीत शहरातील जुन्या पिढीतील प्रतिष्ठितांनी राजेंद्र जगताप साहेबांची भेट घेवून चर्चा केली त्या चर्चेतून असा सूर आला की शहरातील मोठा असलेल्या मात्र महामार्गाच्या तुलनेने छोटा असलेल्या सुभाष रस्त्याचे सदर नामकरण करून नगरपालिका नेमकं सिद्ध तरी काय करू इच्छिते हेच कळत नाही. या छोट्या रस्त्याचे नामकरण करण्या ऐवजी धुळे सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावरील पेंडगाव येथे भव्य स्वागत कमान उभारून त्या ठिकाणी आदिशक्ती संत मुक्ताबाई पालखी मार्ग असा उल्लेख करणे अधिक संयुक्तिक राहील असा निष्कर्ष या चर्चेतून पुढे आला. यातून संत मुक्ताबाईंचे देखील श्रद्धायुक्त महानत्व जपले जाईल. या विषयाची दुसरी बाजू अशी की सुभाष रस्ता हे नाव कदाचित नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या संदर्भातील नसेल तर बीड शहरातील जुन्या काळातील रहिवासी राहिलेले सुप्रसिद्ध वैज्ञानिक सुभाष कोटेचा यांचे नाव देऊन बीड च्या मातीचा अभिमान वाढवलेल्या व्यक्तीचा योग्य सन्मान ही राखला जाईल अशी बीडकर जनतेची मागणी आहे. यासोबतच बीड मधील आण्णाभाऊ साठे चौक याचे नामविस्तारीकरण करून साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे चौक असा भव्य फलक ही दर्शनी भागात लावावा व माळवेस भागामध्ये राहणाऱ्या बहुसंख्य लोकांच्या भावनांचा आदर करत या भागाला माळीनगर असे नामकरण करण्यात यावे अशी मागणी माजी आमदार राजेंद्रजी जगताप साहेब यांनी केली आहे.

# ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण व विविध सामाजिक उपक्रम राबविण्याबाबत बैठक संपन्न

**परळी वै.। प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण, समाजोपयोगी अभियान, आरोग्य शिबिर, गरजूंना मदत, विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, विविध सामाजिक उपक्रमांच्या आयोजनाबाबत नियोजन बैठक उत्साहात पार पडली.**



बैठकीत वाढदिवस साधेपणाने व समाजोपयोगी उपक्रमांद्वारे साजरा करण्याचा निर्धार करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम राबविणे, गरजू नागरिकांना मदत करणे तसेच सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम आयोजित करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रत्येक उपक्रमाचे नियोजन, जबाबदाऱ्या आणि नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्याबाबत सूचना मांडल्या. वाढदिवसानिमित्त समाजहिताचे उपक्रम राबवून ना. पंकजाताई मुंडे यांच्या पर्यावरण संवर्धन व सामाजिक कार्याच्या विचारांना अधिक बळ देण्याचा संकल्प सर्वांनी व्यक्त केला. बैठकीस भाजपच्या ज्येष्ठ नेते डॉ. सौ. शालिनीताई कराड, भाजपा उपाध्यक्ष महादेव इटके, प्रशांत कराड, , वैजनाथ रेकणे, शेख अनिस, नितीन समशेट्टे, जिल्हा कोषाध्यक्ष पवन मोदानी, शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे, नगरसेवक अश्विन मोगरकर, प्रितेश तोतला, राहुल केंद्रे, ऍड. प्रणव मराठे, वैद्यनाथ बँकेचे संचालक कुलभूषण जैन, महिला आघाडीचे अध्यक्ष श्रीमती सुचिता पोखरकर, अल्पसंख्याक आघाडीचे अध्यक्ष शेख शमी, युवा मोर्चा अध्यक्ष सुशील हरंगुळे, परळी कोषाध्यक्ष अनिश अग्रवाल, ज्ञानोबा सुरवसे, भाजपा ओबीसी अध्यक्ष विजय दहिवाळ, भाजपा शहर चिटणीस जितेंद्र मस्के, विकास हालगे, राजकुमार कौलवार, बंडू नाना कोरे, राम तोष्णीवाल, शशिकांत मुंडे, अच्युत जोगदंड सर, गोविंद चौरे, योगेश पांडकर, उमेश निळे, दिलीप नेहरकर, पवन तोडकरी, खालेद राज, नारायण गर्जे, शेख खदिर, सय्यद सईद भाई, बंडू आघाव सर, विराज गीते, कृष्णा बेदरकर, रेहाना भाभी आदी कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# रोटरी क्लब ऑफ बीडच्या अध्यक्षपदी श्रीगोपाल लड्डा तर सचिवपदी सुहास बेदरे; समाजोपयोगी उपक्रमांना गती देण्याचा निर्धार

**शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि युवक विकास क्षेत्रात व्यापक काम करण्याचे नूतन पदाधिकाऱ्यांचे प्रतिपादन**

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, युवक विकास आणि सामाजिक सेवा या क्षेत्रात अधिक व्यापक आणि परिणामकारक उपक्रम राबविण्यासाठी सर्व सदस्यांच्या सहकार्याने काम केले जाईल, असे प्रतिपादन नूतन अध्यक्ष श्रीगोपाल लड्डा आणि सचिव सुहास बेदरे यांनी यावेळी केले.बीड येथील हॉटेल अन्विता येथे रोटरी क्लब ऑफ बीडच्या ४१ व्या पदग्रहण सोहळ्यात अध्यक्षपदाची धुरा श्रीगोपाल लड्डा यांनी तर सचिवपदाची जबाबदारी सुहास बेदरे यांनी स्वीकारली.





कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्रांतपाल हरीश मोटवानी, सहाय्यक प्रांतपाल नितीन गोपाल आणि मेंटर सुहास लाहोटी उपस्थित होते. याशिवाय रोटरी परिवारातील पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर, नव्याने सहभागी झालेले सदस्य तसेच मोठ्या संख्येने सदस्य उपस्थित होते. नूतन अध्यक्ष श्रीगोपाल लड्डा यांनी आपल्या मनोगतात आगामी वर्षातील विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. समाजातील गरजू घटकांपर्यंत सेवा कार्य पोहोचविण्यासाठी क्लबच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. शिक्षण क्षेत्रातील मदत, आरोग्यविषयक जनजागृती, पर्यावरण संवर्धन आणि युवकांना प्रोत्साहन देणारे उपक्रम राबविण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी नमूद केले. सचिव सुहास बेदरे यांनी क्लबच्या विविध उपक्रमांचे प्रभावी नियोजन आणि अंमलबजावणीसाठी सर्व सदस्यांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगितले. समाजातील विविध घटकांच्या गरजा लक्षात घेऊन सेवा प्रकल्पांची आखणी करण्यात येईल तसेच सदस्यांच्या सक्रिय सहभागातून उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात गणेश शिंदे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी निसर्ग संवर्धन, सामाजिक जबाबदारी आणि मूल्याधारित जीवन याविषयी विचार मांडले. पर्यावरण संरक्षण आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. तसेच समाजहिताच्या कार्यात प्रत्येकाने सहभाग नोंदविण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी मावळते अध्यक्ष विकास उमापूरकर आणि मावळते सचिव सुमित जैस्वाल यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्यकाळात विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात आले. क्लबच्या विकासासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे नियोजन क्लबच्या सर्व सदस्यांच्या सहकार्याने करण्यात आले. शेवटी सचिव सुहास बेदरे यांनी उपस्थित मान्यवर, सदस्य आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

### मावळत्या पदाधिकाऱ्यांच्या कार्याचा गौरव

मावळते अध्यक्ष विकास उमापूरकर आणि मावळते सचिव सुमित जैस्वाल यांच्या कार्यकाळात विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात आले. त्यांच्या योगदानाचा पदग्रहण सोहळ्यात गौरव करण्यात आला.

### आगामी वर्षातील प्राधान्याचे उपक्रम

शिक्षण क्षेत्रातील सेवा प्रकल्प., आरोग्यविषयक उपक्रम., पर्यावरण संवर्धन आणि वृक्षारोपण., युवक विकास कार्यक्रम., सामाजिक सेवा उपक्रम., यासह रोटरी क्लबच्या धोरणात्मक इतर उपक्रमांचा समावेश असेल.

### मावळत्या पदाधिकाऱ्यांच्या कार्याचा गौरव

मावळते अध्यक्ष विकास उमापूरकर आणि मावळते सचिव सुमित जैस्वाल यांच्या कार्यकाळात विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात आले. क्लबच्या सेवा कार्याचा विस्तार करण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा पदग्रहण सोहळ्यात विशेष गौरव करण्यात आला. उपस्थित सदस्यांनी त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

## पान १ वरून...

### निकषांतील बदलामुळे कर्जमाफीचा

मागविण्यात आली असून त्यासंबंधीचा प्रस्ताव केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंजूर केला आहे. हा प्रस्ताव आता राज्यपालांच्या अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात आला असून, मंजुरी मिळाल्यानंतर कर्जमाफीची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होईल, असे त्यांनी सांगितले. भरणे यांनी सांगितले की, कर्जमाफीस थोडासा विलंब झाला असला तरी त्यामागे लाभार्थ्यांची अचूक पडताळणी आणि निकष स्पष्ट करण्याचे कारण आहे. यामुळे भविष्यात पात्रता, लाभवाटप किंवा तांत्रिक अडचणी निर्माण होणार नाहीत. लाभार्थ्यांची माहिती पडताळून अंतिम यादी तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असल्याचेही त्यांनी नमूद केले. निकषांतील बदलांमुळे कर्जमाफीच्या योजनेचा आर्थिक भारही वाढणार असल्याचे त्यांनी सांगितले. सुरुवातीला या योजनेसाठी सुमारे ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित होता. मात्र, नव्या निर्णयांनंतर हा खर्च वाढून सुमारे ४० हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचणार आहे. तरीही राज्य सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी हा अतिरिक्त आर्थिक भार स्वीकारण्यास तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कर्जमाफीच्या प्रक्रियेबाबत कोणताही संभ्रम बाळगण्याचे कारण नसून, जुलै महिना संपण्यापूर्वीच पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीचा लाभ पोहोचविण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचा ठाम विश्वास कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केला. त्यामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांचे लक्ष आता सरकारच्या अंतिम निर्णयाकडे लागले आहे.

---

### महाराष्ट्र होणार रेल्वे फाटक

पूर्ण करण्यात येणार आहे. रेल्वे प्रकल्पासंदर्भातील बांधकामासाठी महारेलची स्थापना केल्यामुळे पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळाली आहे. नागपूरसह मुंबईतील अतिशय कठीण पुलांच्या बांधकामांचे नियोजनबद्ध काम जलद गतीने पूर्ण करण्यात आले आहे. महारेलने नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा अवलंब केला असून, यासाठी पेटंटसुद्धा मिळविले आहे.

---

### आ.रोहित पवार अडचणीत!

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने मंडळाच्या अधिका–यांनी ३ जुलैला कारखान्याची तपासणी केली. त्यावेळी कारखान्यात पर्यावरण नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले. मंडळाने कारखाना चालविताना आखून दिलेल्या नियमांचे पालन न केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. या प्रकरणी मंडळाने कारखान्याला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

---

### गोशाळा अनुदानात ३५० कोटींचा

नाशिकमधील तपोवनात वृक्षतोड करण्यात आली. प्रभू श्रीरामांचे वास्तव्य तिथे झाले होते. पर्यावरणप्रेमींनी तिथे आंदोलन केले, तरीही बेफाम पद्धतीने देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने गिरीश महाजन यांनी वृक्षतोड केली आहे. शतकातला सगळ्यात मोठा भ्रष्टाचार या ठिकाणी सुरू आहे. सगळे गुजरातचे ठेकेदार आहेत, त्यांनाच सर्व कामे देण्यात आली आहेत, असा पुनरुच्चारही त्यांनी केला. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत, अधूनमधून ते विधानभवनात हिंदीत भाषण करत असले तरी महाराष्ट्रात मराठीच चालेल. राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या मनात थोडी जरी मराठी भावना जागृत असेल तर ते कारवाई करतील. नरेंद्र मोदी यांना वाटत असेल की केंद्रात देवेंद्र फडणवीस योग्य आहेत, तर नक्कीच त्यांना दिल्लीत घेतले जाईल, महाराष्ट्र त्यांच्या हातात राहणार नाही. आता महाराष्ट्र गुंडांचे राज्य झाले आहे, फडणवीस दिल्लीत जातील, असे भाकीतही राऊतांनी यावेळी केले.

---

### दिड महिन्यात ७०

असून, पूर्वी दोन शिफ्टमध्ये होणारी मोजणी आता फक्त एका शिफ्टमध्ये केली जाणार आहे. पोलिसांच्या चौकशीत मिळालेल्या माहितीनुसार, चोरीच्या सर्व घटना केवळ संध्याकाळच्या शिफ्टदरम्यान घडल्या होत्या. त्यामुळेच मंदिर प्रशासनाने दानरकमेच्या मोजणीची संपूर्ण व्यवस्था बदलण्याचा निर्णय घेतला. पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, आरोपी अविनाश शुक्ला, अनुकल्प मिश्रा, लवकुश मिश्रा आणि करुणेश पांडे यांच्या चौकशीत अनेक महत्त्वाची माहिती समोर आली. तपासात असे उघड झाले की, सुमारे ४० दिवसांत ७० वेळा दानपेटीतील रक्कम कथितपणे काढण्यात आली. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, या संपूर्ण प्रकरणात अविनाश शुक्ला याची भूमिका सर्वाधिक असल्याचे समोर आले आहे. चौकशीत मिळालेल्या माहितीनुसार, त्याने एकट्यानेच ५० हून अधिक वेळा दानपेटीतील रक्कम चोरली. इतकेच नव्हे, तर काही दिवशी संशयित आरोपींनी एकाच दिवशी दोन वेळा रक्कम काढण्याचाही प्रयत्न केला. तपासात असेही उघड झाले की, ४० दिवसांच्या कालावधीत पाच अशा दिवसांचा समावेश होता, ज्यादिवशी एकाच दिवशी तीन–तीन वेळा कथित चोरी झाली. विशेष म्हणजे, पहिल्या शिफ्टमधील मोजणीदरम्यान अशा प्रकारची एकही घटना घडली नसल्याचे तपासात स्पष्ट झाले. तपास यंत्रणांच्या म्हणण्यानुसार, चौकशीत हेही समोर आले की, अविनाश शुक्ला आणि अनुकल्प मिश्रा हे प्रत्येक वेळी एकमेकांना मदत करत होते. दोघांची भूमिका तसेच इतर संशयित आरोपींसोबतचे त्यांचे संबंध आणि समन्वय यांचा तपास अद्याप सुरू आहे. आतापर्यंतच्या तपासातून असेही स्पष्ट झाले आहे की, कथित चोरीच्या सर्व घटना दुपारी २ ते रात्री ९ या वेळेत चालणाऱ्या दुसऱ्या शिफ्टमधील दानरकमेच्या मोजणीदरम्यानच घडल्या. या पार्श्वभूमीवर मंदिर प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून दानरकमेच्या मोजणीच्या व्यवस्थेत मोठा बदल केला आहे. आता दानपेटीतील रकमेची मोजणी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत फक्त एका शिफ्टमध्ये केली जात आहे. दरम्यान, पोलिस या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास करत असून, चौकशीत समोर आलेल्या माहितीची इतर पुराव्यांशी पडताळणी केली जात आहे.

---

### संसदेच्या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला

भूमिका मांडण्याची संधी मिळणार आहे. यंदाच्या पावसाळी अधिवेशनात अनेक महत्त्वाची विधेयके, आर्थिक तसेच राष्ट्रीय महत्त्वाचे विषय चर्चेसाठी येण्याची शक्यता आहे. त्यामुळे अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या सर्वपक्षीय बैठकीकडे सत्ताधारी आणि विरोधक या दोन्ही बाजूंचे लक्ष लागले आहे.

---

### अंबाजोगाई तालुक्यात

घटनेमुळे परिसरात मोठी दहशत पसरली असून नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. माहितीनुसार, ज्ञानेश्वर वाकडे हा शनिवारी रात्री आपल्या एका मित्रासोबत दुचाकीवरून घाटनांदूर येथून पट्टीवडगाव या आपल्या गावाकडे जाण्यासाठी निघाला होता. हे दोघे अण्णाभाऊ साठे चौकात आले असता काही जणांनी त्यांची दुचाकी अचानक अडवली. काही समजण्याच्या आतच हल्लेखोरांनी ज्ञानेश्वर आणि त्याच्या मित्रावर तीक्ष्ण हत्यारे, दगड आणि विटांनी अमानुष हल्ला चढवला. या भयंकर मारहाणीत रक्ताच्या थारोळ्यात पडून ज्ञानेश्वरचा मृत्यू झाला. त्याच्यासोबत असलेला मित्र या हल्ल्यात गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात तातडीने उपचार सुरू आहेत. हा जीवघेणा हल्ला कोणत्या कारणास्तव झाला हे अद्याप समजू शकलेले नाही. कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे काढणाऱ्या या घटनेने सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या भीषण घटनेनंतर मयत ज्ञानेश्वरचे संतप्त आणि दुःखी नातेवाईक तक्रार देण्यासाठी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात बसून होते. अंबाजोगाई ग्रामीण पोलीस पुढील तपास करत आहेत. पोलीस तपासानंतरच अधिकृत माहिती समजू शकणार आहे.

---

### पावसाळी अधिवेशनात इंडिया आघाडी

वाढती बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि विरोधी पक्षांमध्ये फूट पाडून दोन–तृतीयांश बहुमताचा आकडा गाठण्याचे भाजपचे कथित प्रयत्न, या मुद्द्यांवरून संसदेत जोरदार गदारोळ होण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय जनता दलाचे नवनिर्वाचित खासदार सुधाकर सिंह यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ही माहिती दिली. सुधाकर सिंह यांनी आरोप केला की, भाजप स्वतःकडे पुरेसे संख्याबळ नसतानाही अजेंडा रेटण्यासाठी आणि विरोधी पक्षांना कमकुवत करण्यासाठी फोडाफोडीचे राजकारण करत आहे. भाजपला देशभरातील विरोधी पक्ष फोडून संसदेत दोन–तृतीयांश बहुमत मिळवायचे आहे. परंतु, इंडिया आघाडी या प्रयत्नांना एकजुटीने विरोध करेल. बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेतील त्रुटी यांसारखे जनतेचे ज्वलंत मुद्दे संसदेत प्रकर्षाने मांडले जातील. देशातील विरोधी खासदारांचे होत असलेले पक्षांतर कायदेशीर चौकटीला हरताळ फासणारे आहे. जर हे असेच सुरू राहिले, तर भारताची अवस्था चीन, रशिया किंवा उत्तर कोरियासारखी होईल, जिथे फक्त नावापुरती लोकशाही उरली आहे. निवडणूक आयोगाच्या मतदार याद्यांच्या पुनरिक्षण प्रक्रियेवर संशय व्यक्त करत सुधाकर सिंह यांनी थेट मतदानाच्या अधिकारावर गदा आणली जात असल्याचा आरोप केला. जर खऱ्या मतदारांची नावे यादीतून वगळली गेली, तर निवडणुका मतपेटीतून नाही तर मतदार यादीतूनच जिंकल्या जातील, असे ते म्हणाले. तसेच, केंद्र सरकारने वन नेशन, वन इलेक्शन (एक देश, एक निवडणूक) किंवा मतदारसंघांची पुनर्रचना यांसारखे संविधानाला आणि लोकशाही हक्कांना कमकुवत करणारे कायदे आणल्यास, इंडिया आघाडी संसदेत आणि रस्त्यावर उतरूनही तीव्र संघर्ष करेल, असा इशारा त्यांनी दिला. नीट परीक्षेतील गैरव्यवहाराला सिंह यांनी राष्ट्रीय संकट असे संबोधिले. हा आता केवळ एका परीक्षेचा विषय राहिलेला नाही, तर भारताच्या संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासाचे हे संकट आहे. हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असून अनेक तरुण नैराश्यात गेले आहेत.

---

### बीड पोलिसांच्या नव्या प्रणालीद्वारे

६५ टेस्ट केसेस वर आधारित प्रकल्पाच्या तांत्रिक व कायदेशीर क्षमतांची पडताळणी केली. तज्ज्ञांनी या नाविन्यपूर्ण संकल्पनेचे विशेष कौतुक केले असून, या यशस्वी चाचणीमुळे आता हा प्रकल्प महाराष्ट्रभर आणि भविष्यात संपूर्ण देशासाठी आदर्श मॉडेल म्हणून राबवला जाण्याची शक्यता बळकट झाली आहे. आधुनिक आणि जबाबदार पोलीसिंगच्या दिशेने बीड पोलिसांनी टाकलेले हे पाऊल गुन्हे तपासाच्या क्षेत्रात एक मैलाचा दगड ठरणार आहे. महाराष्ट्र पोलीस दलाच्या तपास प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करण्याच्या दिशेने बीड पोलिसांनी एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. बीड शहर पोलीस ठाण्यात विकसित केलेल्या या पायलट प्रकल्पाची राज्यस्तरीय पाहणी नुकतीच यशस्वीरित्या पार पडली. हा प्रकल्प बीड जिल्हा पोलीस अधीक्षकाने आपल्या कौशल्य मधून निर्माण केला असला तरी याचा फायदा महाराष्ट्रातीलच काय परंतु भविष्यात देशातील गृह विभागाला होईल अशी आशा आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. १३ जुलै २०२६



## थोडक्यात

### शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करा – बबनराव आंधळे

बीड । प्रतिनिधी

दिनांक १२ ७ २०२६ राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीच्या जाचक अटी रद्द करण्यात याव्यात आणि शेतकऱ्यांचा सातबारा खऱ्या अर्थाने कोरा करावा अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केली आहे या मागणीसाठी सर्व जिल्ह्यातील तहसील कार्यालयासमोर ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने तीव्र निदर्शने करण्यात येतील शासनाने कर्जमाफीचा निर्णय घेतला असला तरी या योजनेमध्ये यापूर्वीच्या दोन्ही कर्जमाफी पेक्षा अत्यंत कडक आणि जाचक अटी लावण्यात आल्या आहेत त्यामुळे राज्यातील लाखो शेतकरी या लाभापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे दोन लाखाच्या वर कर्ज असलेल्या सुमारे दोन लाख ९० हजार शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी २०१९ च्या कर्जदार शेतकऱ्यांना न्याय द्या नैसर्गिक आपत्तीमुळे सातत्याने नुकसान झालेल्या २०१९ नंतरच्या बाधित शेतकऱ्यांना अटी शिवाय कर्जमाफीचा लाभ द्या इत्यादी मागण्याचा समावेश करण्यात आला मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.



### तर पुन्हा दादा भुसेंच्या घरासमोर आंदोलन करू – सम्यक विद्यार्थी आंदोलनाचा इशारा

मुंबई । प्रतिनिधी

सम्यक विद्यार्थी आंदोलनाकडून १ जुलै रोजी टीईटी पेपरफुटीच्या विरोधात शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या मालेगाव येथील घरासमोर आंदोलन करून त्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर दादा भुसे यांच्या निवासस्थानी सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत टीईटी पेपरफुटी संबंधित १२ मागण्याच्या चर्चा करून निवेदन दिले त्यापैकी टीईटी पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून दादा भुसे यांनी राजीनामा द्यावा, अशी स्पष्ट मागणी सम्यक विद्यार्थी आंदोलनाकडून करण्यात आली.



आठ दिवसांत मागण्या मान्य करा, अन्यथा पुन्हा दादा भुसे यांच्या घरासमोर राज्यव्यापी आंदोलन करू, असा इशारा देण्यात आला होता.

पण दादा भुसे यांच्या कार्यकर्त्यांकडून सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या कार्यकर्त्यांना विद्यार्थ्यांना पुन्हा दादा भुसे यांच्या घरासमोर आंदोलनाने आले तर मारण्याची धमकी दिली आहे. याच्या निषेधार्थ मुंबई विद्यापीठासमोर दादा भुसेंच्या पोस्टला काळे फासण्यात आले. सम्यक विद्यार्थी आंदोलन दादा भुसे घरात असताना त्यांच्या घराला कुलूप लावण्याची टाकत आम्ही ठेवतो आम्हाला अशा धमक्या देवू नका असे सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या समोर आंदोलन करून इशारा दिला. यावेळी वंचित बहुजन युवा आघाडीचे मुंबई प्रदेशाध्यक्ष सागर गवई, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे कल्याण डोंबिवली महानगराध्यक्ष कमलेश उबाळे, आनंदराज घाटगे, पदाधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्पर्धात्मक परिस्थितीच्या काळात गुणवत्ता महत्वाची - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

येथील 'जय संताजी प्रतिष्ठान'च्या वतीने बीड जिल्ह्यातील तेली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला. समाजातील हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी २०१७ पासून या सातत्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. स्पर्धात्मक परिस्थितीच्या काळात गुणवत्ता महत्वाची असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.





या प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, राजेंद्र बनसोडे, उद्धव क्षीरसागर, सुभाष क्षीरसागर, अरूण गोरे, डॉ. अरुण भस्मे, चंद्रकांत पेंढारे, रामेश्वर पवार, डॉ. राजा मचाले, बाळू क्षीरसागर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना आणि उपस्थितांना मार्गदर्शन करताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, नवी पिढी अत्यंत हुशार असून प्रत्येक क्षेत्रात मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. या स्पर्धेत आपली मुले पुढे जात आहेत, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. संताजी महाराजांचे आशीर्वाद या मुलांना नक्कीच मिळतील. पुस्तकाचे ज्ञान आणि जीवनाचे व्याकरण यामध्ये फरक असतो. पुस्तके आणि धडे वाचता येतात, पण जीवनात संधी एकदाच मिळते; तिचा योग्य उपयोग करून घेता आला पाहिजे. आज ९१% गुण मिळवूनही पुढच्या पायरीवर टिकण्यासाठी तितकीच टक्केवारी राखण्याचे आव्हान विद्यार्थ्यांसमोर असते. त्यातच पेपरफुटीसारखे प्रकार आणि ऑनलाइन की ऑफलाइन शिक्षण यावर विचार करण्याची वेळ आली आहे. सध्या विद्यार्थ्यांचे विभाजन होत असून सोशल मीडियामुळे माणसाचे मन बदलू लागले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नव्या तंत्रज्ञानाचा उल्लेख करत नवे तंत्रज्ञान विकसित होत असून ते क्रांतीकारी बदल घडवून आणत आहे. हे युग तरुणांचे असून मुलांना संधी देण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. आज अनेक क्षेत्रांत मुलांनी भरारी घेतली आहे, त्यांना योग्य प्रोत्साहन मिळाले तर ते नक्कीच पुढे जातील. आता कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे अनेक विषयांची माहिती सहज उपलब्ध होत आहे. संत ज्ञानेश्वरांनी 'अवघे विश्वचि माझे घर' ही जी संकल्पना मांडली होती, ती आजच्या नव्या तंत्रज्ञानाने खरी करून दाखवली आहे. संपूर्ण जग आज तुमच्या मुठीत आले आहे. मात्र, या नव्या तंत्रज्ञानाचा वापर ज्ञानात भर घालण्यासाठी करावा, त्याचा अतिरेक झाल्यास त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही त्यांनी दिला. त्यांनी ओबीसी जनगणनेचाही संदर्भ दिला. १९३१ नंतर ओबीसींची अधिकृत जातगणना झाली नसल्याचे नमूद करत ते म्हणाले की, जर नव्याने जातगणना झाली तर ८ ते ९ कोटींचा समाज समोर येईल. या गणनेचा नेहमी उल्लेख केला पाहिजे, जेणेकरून आपली संख्या स्पष्ट होईल. समाजाचा इतिहास आणि प्रेरणा घेऊन मुलांनी पुढे जाणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी जयदत्त क्षीरसागर यांनी समाजातील वरिष्ठ आणि सक्षम नागरिकांना एक आवाहन केले. पुढच्या वर्षापासून समाजातील वरिष्ठांनी प्रत्येकी १ लाख रुपये देऊन, पहिल्या तीन गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी १ लाख रुपयांची फिक्स डिपॉझिट (ठेव) बक्षीस म्हणून द्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आणि सर्व विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवलिंग क्षीरसागर यांनी केले. या सोहळ्यात जिल्ह्यातील उपस्थित गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या कार्यक्रमासाठी रामेश्वर पवार, नवनाथ साळुंके,रवींद्र राऊत, विजय काळे, कैलास टोंनपे, उमेश पवार आणि तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माळापुरी येथे दशपर्णी अर्क तयार करण्याचे प्रात्यक्षिक; सेंद्रिय शेतीचा संदेश

माळापुरी । प्रतिनिधी

सौ. के. एस. के. (काकू) कृषी महाविद्यालयाच्या कृषीदूतांनी ठ–थए कार्यक्रमांतर्गत माळापुरी येथे दशपर्णी अर्क तयार करण्याचे प्रात्यक्षिक आयोजित करून शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीतील प्रभावी जैविक कीडनियंत्रणाबाबत मार्गदर्शन केले. प्रात्यक्षिकादरम्यान दशपर्णी अर्क तयार करण्यासाठी लागणारी सामग्री, तयार करण्याची शास्त्रीय पद्धत, वापरण्याची मात्रा, फवारणीची योग्य वेळ तसेच त्याचे फायदे याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी कडुनिंब, करंज, सीताफळ, रुई, निर्गुडी, धोतरा, पपई, एरंड, कण्हेर आणि गुळवेल या दहा वनस्पतींची पाने तसेच गूळ, ताजे गोमूत्र आणि शेण वापरून दशपर्णी अर्क तयार करण्याची प्रत्यक्ष प्रक्रिया दाखविण्यात आली.





दशपर्णी अर्काच्या वापरामुळे पिकांवरील विविध किडींचे प्रभावी नियंत्रण होण्यास मदत होते, रासायनिक कीटकनाशकांवरील खर्च कमी होतो, मातीचे आरोग्य सुधारते आणि पर्यावरणपूरक शेतीला चालना मिळते, असे यावेळी कृषीदूतांनी सांगितले. उपस्थित शेतकऱ्यांनी प्रात्यक्षिकाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे समाधान करून घेतले. माननीय सहसचिव डॉ. जी. व्ही. साळुंखे सर, प्राचार्य डॉ. एस. पी. मोरे सर, विशेषज्ञ प्रा. एस. व्ही. राठोड सर तसेच कार्यक्रम अधिकारी (PO) डॉ. एस. जी. माने सर व कार्यक्रम समन्वय प्रा. डी. बी. राठोड सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. तसेच गावचे सरपंच श्री. अशोकराव ढास आणि उपसरपंच समीर भाई बेग यांनीही उपक्रमास मोलाचे सहकार्य केले. या प्रात्यक्षिकाचे आयोजन सौ. के. एस. के. (काकू) कृषी महाविद्यालयाचे कृषीदूत सुमेध वाघमारे, वैद्य दत्ता, वखरे रोहन, थोरात पवन, थोरात अनंता, अमंतराजे शेळके, शिरामे प्रतीक, विजय शिंदे, तळेकर आदित्य आणि राहुल उबाळे यांनी केले.

## यूसूफवडगावात संत गजानन महाराजांच्या पालखीचे भक्तिभावाने स्वागत; श्रींच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

युसूफवडगाव । प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी निघालेल्या संत श्री गजानन महाराजांच्या पालखीचे काल केज तालुक्यातील युसूफवडगाव येथे रविवारी भक्तिमय वातावरणात जल्लोषात स्वागत करण्यात आले. पालखी गावात दाखल होताच टाळ–मृदंगाच्या गजरात आणि गण गण गणात बोते तसेच विठ्ठल... विठ्ठल...च्या अखंड नामघोषाने परिसर दुमदुमून गेला.

जि.प शाळेच्या आवारात दिंडी विसावा व नाष्टासाठी थांबली असता श्रींच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी युसूफवडगाव व परिसरातील शेकडो भाविकांनी मोठी गर्दी केली. महिला, पुरुष, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी श्रींचे दर्शन घेत आशीर्वाद प्राप्त केला. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.



यावेळी मयुर भगवान खंडेलवाल यांच्या पुढाकाराने व ग्रामस्थांच्या सहकार्याने दिंडीतील वारकरी भाविकांसाठी नाश्ता व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. ग्रामस्थांनी वारकऱ्यांचे प्रेमाने स्वागत करत सेवाभावाची सुंदर परंपरा जपली.श्रींचे दर्शन व अल्प विश्रांतीनंतर संत गजानन महाराजांची पालखी पुढील वारीसाठी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली.

## माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन –अजिंक्य आनेराव

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते तथा राज्याचे माजी मंत्री मा. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १४ जुलै २०२६ रोजी बीड येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा कार्यालय, मित्रनगर चौक येथे सकाळी १०.०० ते दुपारी २.०० या वेळेत आयोजित करण्यात आले असून, या उपक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष इंजी. अजिंक्य आनेराव यांनी केले आहे.या रक्तदान शिबिरात राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते, युवक, विद्यार्थी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन इंजि. अजिंक्य आनेराव यांनी केले आहे.यावेळी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, समाजात रक्तदानाबाबत जनजागृती करणे आणि गरजू रुग्णांसाठी आवश्यक रक्तसाठा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.



माजी मंत्री धनंजय मुंडे साहेब हे नेहमीच सामाजिक कार्यात पुढाकार घेत असतात. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन त्यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या सामाजिक उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते,युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करावे,असे आवाहन राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष इंजि. अजिंक्य आनेराव यांनी केले आहे.

## पान ६ वरुन...

### मोठेवाडी दिंडीचे

मार्गे पंढरपूरला पोहोचेल. गायनाचार्य ह.भ.प. लक्ष्मण महाराज पांचाळ, विठ्ठल महाराज थोरात, मृदंगाचार्य शुभम म.थोरात यांच्यासह शेकडो वारकरी या दिंडीत सहभागी झाले आहेत. यात हभप. बळीराम पास्टे, काशीनाथ किनोळकर,मधुकर सर्जे, जनार्दन गोंडे,अंगद पास्टे,वसंत बल्लाळे,सखाराम पास्टे, शिवाजी खेत्री,माऊली पास्टे,रामदास शिवलींगे,रामकिसन पास्टे,राजेश घोडके, दिनकर खेत्री यांसारखे अनेक ज्येष्ठ वारकरी तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने सामील झाले असून, संपूर्ण परिसर भक्तिमय झाला आहे.

### राम मंदिरातील कथित आर्थिक

निष्पक्ष आणि सर्वंकष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी केली. तसेच चौकशीत दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. या सत्याग्रह आंदोलनात तालुकाध्यक्ष महावीर मस्के, एडवोकेड सय्यद याकूब ,दत्ता कांबळे, रशीद शेख , आफ्रोज शेख , फारुक शेख, हसन शेख, शफीकभाई तसेच ह.भ.प. आत्माराम कोळसे महाराज यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

### जिल्हा रुग्णालयात जागतिक

नियंत्रणात ठेवण्यासाठी शासन मोठे प्रयत्न करते. लोकसंख्येवर नियंत्रण राहिल्यास अनेक प्रश्न सुटतात. जन्म आणि मृत्यू यांचे योग्य प्रमाण राहिल्यास लोकसंख्यावर नियंत्रण राहील. दारिद्र्य कमी करून जीवनमान उंचावण्यासाठी लोकसंख्या नियंत्रणात असणे गरजेचे आहे. लोकसंख्या नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वांच्या प्रयत्नाची गरज आहे. उज्वल भवितव्यासाठी आपल्या जीवनात शासन नियमांचे पालन करावे, असे त्यांनी आवाहन केले.जागतिक लोकसंख्या दिनाच्या कार्यक्रमास मेट्रन श्रीमती रमा गिरी, सिस्टर दाणे, जिल्हा रुग्णालयाचे व्यवस्थापक यांची उपस्थिती होती.

### नामकरण झाले मात्र

कामांमध्ये कुचराई झाली नसती आणि लोकप्रतिनिधींचे असे वाभाडे नक्कीच निघाले नसते हे स्पष्टच आहे.

नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या नावाने ओळखला जाणारा सुभाष रोड हा मार्ग आजही सर्व बीडकरांच्या मनामनावर 'ने.सुभाष रोड' या नावानेच कोरलेला आहे. आझाद हिंद सेना नावाने भारत देशाची पहिली आर्मी स्थापन करणारे व 'तुम मुझे खून दो मै तुम्हे आजादी दूंगा' असा नारा भारतीयांच्या तना–मनामध्ये बुलंद करत ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध पहिले सशस्त्र युद्ध पुकारणारे स्वातंत्र्यसंग्रामाचे महानायक नेताजी सुभाष बाबू यांची ती बीडकरांसाठी एक कायमस्वरूपी आठवण आहे. त्यामुळे बीडकरांच्या मनामध्ये व स्मरणामध्ये हा रस्ता कायमस्वरूपी नेताजी सुभाष रोड नावानेच वास करीत राहील यात यत्किंचितही कोणालाही शंका नाही असे बीड शहरातील जनतेचे व जनतेच्या वतीने बीड शहर बचाव मंचाचे प्रामाणिक ठाम मत आहे आणि कायम राहील.

### श्रीराम मंदिर देणगी गैरव्यवहाराच्या

देशभरात सत्याग्रहाचे आयोजन केले आहे. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटी चे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खा रजनी ताई पाटील, मा मंत्री अशोकराव पाटील, आदित्य दादा पाटील जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाईत देखील हे आंदोलन करण्यात आले.सकाळी १०.३० वाजता सर्व कार्यकर्ते राम मंदिरासमोर एकत्र जमले. यावेळी रघुपती राघव राजाराम पतित पावन सीताराम चा सामूहिक जप करण्यात आला. त्यानंतर केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.आंदोलनकर्त्यांनी वारकरी पांढऱ्या टोप्या आणि कॉंग्रेसचा स्कार्फ/ गमजे घालून याच बरोबर अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन येथे तक्रार देत गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली. यावेळी बोलताना अंबाजोगाई तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभिजीत लोमटे म्हणाले, श्रद्धेच्या नावाखाली जनतेच्या पैशाचा अपहार करणाऱ्यांना कॉंग्रेस पक्ष तसेच रामभक्त कधीच माफ करणार नाही. श्रीराम आमच्या मनात आहेत. पण रामाच्या नावावर केलेला भ्रष्टाचार आम्ही सहन करणार नाही. जोपर्यंत दोषींवर कारवाई होत नाही तोपर्यंत आमचा लढा सुरू राहील.या आंदोलनाला अंबाजोगाई तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभिजीत लोमटे, शहराध्यक्ष बाबा खतीब, अच्युत इंगळे,अनिल पालेकर, रावसाहेब घाडगे, प्रदीप जोगदंड, श्रीकांत देशमूख,शेख अकबर, संजय वाघमारे श्री रोडे,अनिल अवचित्ये,अमर लोमटे, मल्हार जोगदंड,अभिमन्यू पाटील, यांच्यासह कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण आंदोलन शांततेत पार पडले. कॉंग्रेसने दिलेल्या निवेदनाची दखल न घेतल्यास यापेक्षा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

### कै.विठ्ठल जाधव यांच्या

फळाहार देण्यात आला. या सेवाभावी उपक्रमाचे आयोजन कै. विठ्ठल जाधव यांच्या स्मरणार्थ त्यांच्या पत्नी श्रीमती सुलभा जाधव या गेल्या २७ वर्षांपासून सातत्याने करत आहेत. त्यांच्या या कार्यात बाळाराजे भाकड, हर्षवर्धन जाधव, संग्राम वारूळे, संकेत घुले, कृष्णा देशमुख, अमोल घुले, सिद्धेश चंदनशिव, मुद्रा ग्रुपचे चेअरमन उमेश दादा पवार, मनीषाताई पवार, केशव चेडे, यश यादव, शौर्य जाधव, डॉ. संतोष पवार, माजी ग्रामपंचायत सदस्य रावसाहेब मामा सपकाळ, दुर्योधन काळे, ऋषिकेश जाधव, छाया घुले यांच्यासह अनेक मान्यवरांचे मोलाचे सहकार्य लाभले.यावेळी दिंडी चालक ह.भ.प. ओमकार महाराज खरात यांचा पुणे पत्रकार संघाचे अध्यक्ष कृष्णा देशमुख व संकेत घुले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच विणेकरी अशोक वाकडे, ह.भ.प. सोपानकाका खरात, राजेंद्र गाडे तसेच भीमसिंह मंडपचे दादासाहेब खरात यांच्यासह अनेक वारकरी सेवकांचाही सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी वारकऱ्यांना पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.या आरोग्य शिबिरासाठी मानस हॉस्पिटलचे डॉ. विजयकुमार भोर आणि यशवंत हॉस्पिटलच्या डॉ. शुभांगीताई भोर यांनी गेल्या २७ वर्षांपासून सातत्याने वैद्यकीय सहकार्य देत उपक्रमाला बळ दिले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णा देशमुख यांनी केले, तर ज्ञानेश्वर जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# आदित्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सिरसाळा येथे ग्रामीण विकासाचा प्रत्यक्ष अनुभव

## ग्लोबल विकास ट्रस्टमध्ये सात दिवसीय निवासी एनजीओ प्रशिक्षण

बीड । प्रतिनिधी

शहरातील आदित्य कृषी महाविद्यालय बी.एस्सी. (ऑनर्स) कृषी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक उपक्रम कार्यक्रमांतर्गत सात दिवसीय निवासी एन.जी.ओ. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. परळी वैजनाथ तालुक्यातील सिरसाळा येथील 'ग्लोबल विकास ट्रस्ट' अंतर्गत कार्यरत कृषिकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्रात या विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात नेहमीच विविध सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक उपक्रम राबवले जातात. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रावरील संशोधन आणि कार्यानुभावाची माहिती मिळावी, या उद्देशाने या सात दिवसीय निवासी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.



प्रशिक्षणादरम्यान ग्लोबल विकास ट्रस्टचे अधिकारी डॉ. प्रवीण मांजरे यांनी विद्यार्थ्यांना स्वयंसेवी संस्थांची कार्यपद्धती, ग्रामीण विकासातील त्यांचे योगदान, शेतकरी प्रशिक्षण उपक्रम, महिला सक्षमीकरण आणि विविध शासकीय कृषी विकास योजनांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. केवळ सैद्धांतिक माहिती न देता विद्यार्थ्यांना संस्थेमार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांनी या सात दिवसांत गोशाळा व्यवस्थापन, शाश्वत व सेंद्रिय शेती पद्धती, रेशीम शेती (सेरीकल्चर), पाणी व्यवस्थापन तंत्रज्ञान तसेच विकसित फळपिकांच्या विविध जातींची प्रत्यक्ष माहिती घेतली. एन.जी.ओ.च्या दैनंदिन कामकाजाचा जवळून अभ्यास केल्यामुळे ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासात स्वयंसेवी संस्थांचे महत्त्व किती मोठे आहे, हे विद्यार्थ्यांना समजून घेता आले. महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भूतडा यांच्या नियोजनाखाली हे प्रशिक्षण पार पडले. समारोपप्रसंगी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना उपस्थिती प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्लोबल विकास ट्रस्टचे अधिकारी व कर्मचारीवृंद यांचे विशेष सहकार्य लाभले. महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. धनंजय सातपुते, डॉ. खेडकर, डॉ. येडगे आणि डॉ. कुमार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### सर्वांगीण विकासासाठी स्तुत्य उपक्रम

महाविद्यालयाने आयोजित केलेले हे सात दिवसीय निवासी प्रशिक्षण आमच्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरले. केवळ पुस्तकी ज्ञान न घेता ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव आणि एन.जी.ओ.चे कार्य जवळून पाहता आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयाचा हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे.–अभिजीत बोंदर, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी

### विद्यार्थीहितासाठी आदर्श उपक्रम

ग्लोबल विकास ट्रस्टच्या भेटी दरम्यान आम्हाला शाश्वत शेती, सेंद्रिय पद्धती आणि पाणी व्यवस्थापनाचे उत्तम तंत्रज्ञान शिकायला मिळाले. भविष्यात कृषी पदवीधर म्हणून काम करताना या व्यावहारिक ज्ञानाचा मोठा फायदा होईल. विद्यार्थीहिताला प्राधान्य देणारा हा एक आदर्श उपक्रम आहे.

–कृष्णा देवकते, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी

# होर्मूझमधील वाहतूक पुन्हा ठप्प; खतांच्या दरवाढीची चिन्हे

पुणे / प्रतिनिधी

अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावामुळे होर्मूझ सामुद्रधुनीतील सागरी वाहतुकीवर पुन्हा परिणाम झाला असून, त्याचा जागतिक खतबाजारावर परिणाम दिसू लागला आहे. युरियाच्या किमतीही वाढू लागल्या असून, स्फुरद खतांच्या दरातही तेजीची चिन्हे दिसत असल्याचे 'कृषी बाजार माहिती प्रणाली'मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या आढाव्यात नमूद करण्यात आले आहे.

जागतिक कृषी बाजारावर लक्ष ठेवणाऱ्या 'एएमआयएस'ने खत आणि सागरी वाहतूक क्षेत्रातील ताज्या घडामोडींचा आढावा घेतला आहे. गेल्या महिन्यात होर्मूझचा मार्ग खुला झाल्यानंतर पुरवठ्यावरील ताण काहीसा कमी झाला होता. मात्र जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात तणाव वाढल्याने पुरवठ्याबाबतची अनिश्चितता पुन्हा वाढली आहे. या अहवालानुसार, तणावाच्या काळात अडकून पडलेली युरिया, गंधक (सल्फर), स्फुरद (फॉस्फेट) आणि अमोनियाची मालवाहू जहाजे बहुतांश मार्गस्थ




झाली आहेत. मात्र ही जहाजे पुन्हा आखातात परतण्याबाबत अनिश्चितता कायम असल्याने पुरवठ्यावर दबाव राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे युरियाच्या किमती वाढू लागल्या आहेत. स्फुरद खतांच्या बाबतीत परिस्थिती अधिक आव्हानात्मक असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. उत्पादन खर्च विक्रमी पातळीवर असून, गंधकाच्या पुरवठ्यातील अडचणी कायम आहेत. त्यामुळे स्फुरद खतांचा पुरवठा मर्यादित राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर खत उत्पादक 'द मोझाईक कंपनी'ने अमेरिका आणि ब्राझीलमधील स्फुरद उत्पादन आणखी कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. 'एएमआयएस'च्या मते, जूनमध्ये दिसून आलेली खतांच्या दरातील नरमाई अल्पकालीन ठरू शकते.

होर्मूझ सामुद्रधुनीतील तणाव आणि स्फुरद उत्पादनावरील वाढता खर्च कायम राहिल्यास भारतासारख्या आयातनिर्भर देशांना खरीप हंगामात खतांसाठी अधिक किंमत मोजावी लागू शकते. खतांचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी काही देशांनी उपाययोजना सुरू केल्या आहेत. अमेरिकेने मोरोक्कोहून आयात होणाऱ्या काही स्फुरद खतांवरील आयात शुल्क तात्पुरते हटविले आहे. तसेच देशांतर्गत खत उत्पादनाला चालना देण्यासाठी अमेरिकेच्या कृषी विभागाने ५० कोटी डॉलरच्या निधीची घोषणा केली आहे.

## कांदा बियाण्याचे दर मंदावले; अल्प पावसामुळे शेतकऱ्यांकडून यंदा मागणी कमी

पुणे / प्रतिनिधी

कांदा बियाण्याचा दर मागील वर्षाच्या तुलनेत एक किलोला एक हजार रुपयाने कमी झाला आहे. यंदा बियाणे सहज उपलब्ध असले, तरी पाऊस पडला तरच रोपे टाकली जाणार आहेत. आषाढी वारी झाली की, शेतकरी कांदा लागवडीच्या तयारीला लागतात. रोप टाकण्याची एकच गडबड सुरू होते. यंदा मृग, आर्द्रानंतर पुनर्वसु नक्षत्रही कोरडे चालले आहे. ऐन पावसाळ्यात आहे ती पिके जोपासणे कठीण झाले आहे. पांढरेशुभ्र आभाळ व उन्हाळ्याप्रमाणे पडणाऱ्या उन्हामुळे शेतकऱ्यांच्या पोटात गोळा येत आहे. ऐन पावसाळ्यात जमिनीतील पाणी पातळी खोलवर जात आहे. त्यामुळे पिके जगवायची कशी? हा प्रश्न सतावत आहे.

मागील वर्षापेक्षा कंपनीच्या कांदा बियाण्याच्या दरात यंदा किमान एक हजार रुपयाने घट झाली आहे. बियाणे जरी स्वस्त झाले असले, तरी पाऊस नसल्याने रोपे तयार केली जात नाहीत. मागील वर्षी शेतकऱ्यांकडून मागणी असलेल्या नामांकित कंपनीच्या कांदा बियाण्याचा एक किलोचा दर दोन हजार ४०० ते दोन हजार ६०० इतका होता. यंदा याच बियाण्याचा दर दीड हजार रुपयांपर्यंत आहे. शेतकऱ्यांनी कंपनीच्या बियाण्याप्रमाणे तयार केलेले बियाणे मागील वर्षी १७०० - १८०० रुपये किलो होते. सध्या ९००-१००० रुपये दर आहे. बियाणे आहे मात्र ग्राहक नाही, असे चित्र सध्या बाजारात आहे. खरीप हंगाम पेरणीचा कालावधी संपल्याने दुकानातील बियाणे पडून आहे. चांगला पाऊस पडल्यानंतर शेतकरी कांदा रोप तयार करतील.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६० : पावनखिंड झुंजवणार्या वीर बाजीप्रभू देशपांडे यांनी शिवाजी महाराज विशाळगडावर पोहोचल्याच्या खुणेच्या तोफांचे आवाज ऐकल्यावर 'आता मी सुखाने मरतो' असे म्हणून प्राण सोडला.
१८३७ : राणी व्हिक्टोरिया बकिंगहॅम पॅलेसमध्ये राहायला गेली. तेव्हापासून ते इंग्लंडच्या राजाचे/राणीचे अधिकृत निवासस्थान बनले.
१८६३ : सक्तीच्या सैन्यभरती विरोधात न्यूयॉर्क शहरात दंगा झाला.
१८०३ : साली राजा राम मोहन राय आणि अलेक्झांडर डफ यांनी आपल्या पाच विद्यार्थ्यांसोबत स्कॉटिश चर्च महाविद्यालयाची स्थापना केली.
१९०५ : कलकत्ता येथील साप्ताहिक वर्तमानपत्र 'संजीवनी' मध्ये पहिल्यांदा विदेशी मालाचा बहिष्कार करा म्हणून प्रकाशित करण्यात आलं.
१९०८ : लोकमान्य टिळकांवर दुसर्या राजद्रोहाच्या खटल्याचे काम सुरु झाले.
१९०८ : ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये स्त्रियांना भाग घेण्यास परवानगी.
१९२९ : जतिंद्रनाथ दास यांनी लाहोर तुरुंगात आपले आमरण उपोषण सुरू केले. या उपोषणातच त्यांचा मृत्यू झाला.
१९५५ : २८ वर्षीय रुथ एलीसला प्रियकराचा खून केल्याबद्दल फासावर चढविण्यात आले. हॉलो वे तुरूंगातली ही फाशी ग्रेट ब्रिटनमधली स्त्रीकैद्याची अखेरची फाशी ठरली.
१९७७ : रोहित्रावर वीज पडल्यामुळे न्यूयॉर्क शहरातील वीजपुरवठा दीर्घकाळ खंडित झाला.
१९८३ : श्रीलंकेत वांशिक हत्याकांड. ३,००० तामिळ व्यक्तींची हत्या. ४,००,००० हून अधिक तामिळींचे पलायन.
२००६ : ईराण देशांतील अणुबॉम्ब निर्माण प्रकरण संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेकडे देण्यात आले.
२०११ : मुंबई शहरात झालेल्या ३ बॉम्बस्फोटात २६ जण ठार तर १३० जण जखमी झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६३ : अँग्लो-इंडियन इजिप्तज्ञ, पुरातत्वशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, इतिहासकार आणि लोककलाकार तसचं, युनायटेड किंगडममधील पुरातत्व शाखेच्या प्राध्यापक मार्गारेट अलीस मुरे यांचा जन्मदिन.
१८९२ : केसरबाई केरकर जयपूर-अत्रौली घराण्याच्या शास्त्रीय गायिका (मृत्यू: १६ सप्टेंबर १९७७)
१९३० : माजी भारतीय क्रिकेटपटू व माजी भारतीय कसोटी क्रिकेट पंच स्वरूप किशन यांचा जन्मदिन.
१९४० : भारतीय विद्वान, कादंबरीकार, लघुकथा लेखक आणि इंग्रजी आणि हिंदी साहित्याच्या कवी सुनिता जैन यांचा जन्मदिन.
१९४२ : हॅरिसन फोर्ड अमेरिकन अभिनेता
१९४४ : रुबिक क्यूब चे निर्माते एरो रुबिक यांचा जन्म.
१९५३ : राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सन्मानित भारतीय तमिळ भाषिक कवी, गीतकार आणि कादंबरीकार वैरामुथू रामासामी यांचा जन्मदिन.
१९६४ : भारतीय क्रिकेट खेळाडू उत्पल चॅटर्जी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६० : पावनखिंड लढवून बाजीप्रभू देशपांडे यांनी स्वराज्यासाठी आपल्याल प्राणाचे बलिदान दिले.
१७९३ : फ्रेंच क्रांतिकारी ज्याँपॉल मरात यांचे निधन.
१९६९ : महर्षी न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद तत्त्वज्ञ, विचारवंत, योगी, स्वातंत्र्य सैनिक आणि लेखक. (जन्म: १२ जानेवारी १९०२)
१९६९ : बंगाली शिक्षणतज्ञ, लेखक, तत्वज्ञानी आणि पूर्व पाकिस्तानचे भाषाशास्त्रज्ञ मुहम्मद शाहिदुल्ला यांचे निधन.
१९८० : बोत्स्वानाचे पहिले राष्ट्राध्यक्ष सेरेत्से खामा यांचे निधन.
१९९० : अर्देशिर फुर्दोरजी सोहराबजी ऊर्फ 'बॉबी' तल्यारखान क्रीडा समीक्षक व समालोचक (जन्म: ? ? १८९७)
१९९४ : पं. कृष्णा गुंडोपंत तथा 'के. जी.' गिंडे शास्त्रीय (धृपद) गायक, संगीतकार व शिक्षक (जन्म: २६ डिसेंबर १९२५)
१९९५ : ज्ञानपीठ पुरस्कार विजेता भारतीय बंगाली भाषिक कादंबरीकार आणि कवी आशापूर्ण देवी यांचे निधन.
१९९५ : भारतीय पत्रकार आणि स्तंभलेखक तसचं, सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट मसिक लेखिका देवयानी चौबाल यांचे निधन.
२००० : इंदिरा संत साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या कवयित्री व लेखिका (जन्म: ४ जानेवारी १९१४)
२००९ : निळू फुले संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी मराठी चित्रपट अभिनेते (जन्म: ? ? १९३०)
२०१० : मनोहारी सिंह भारतीय संगीत दिग्दर्शक, सैक्सोफोनिस्ट आणि चित्रपट संगीतकार तसचं, गीतकार आर. डी. बर्मन यांचे मुख्य संयोजक (जन्म: ८ मार्च १९३१)

## कमी पावसात भरडधान्याची लागवड केल्यास फायदेशीर



यंदा हवामानशास्त्र विभागाने पाऊस सरासरीपेक्षा कमी पडण्याची शक्यता वर्तवली आहे. त्या सोबतीने पावसामध्ये खंड पडण्याचीही शक्यता वर्तविली जात आहे. तसेच युद्धजन्य परिस्थितीमुळे खतांच्या टंचाईची भीती कायम मनात आहे. अशा परिस्थितीत कमी पाणी, कमी खत आणि प्रतिकुल हवामानात तग धरणाऱ्या, चांगले उत्पादन देणाऱ्या आणि बाजारात मागणी असणाऱ्या भरडधान्याची लागवड शेतकऱ्यांना फायदेशीर ठरु शकते.

भरडधान्याचे फायदे : भात, सोयाबीन, कापूस, ऊस या पिकांच्या तुलनेत भडधान्यांना अत्यंत कमी पाणी लागते. त्यामुळे कोरडवाहू क्षेत्रासाठी भरडधान्य उत्तम पिके आहेत. मानवी आहारात या पिकांचे महत्त्व खूप वाढले आहे. यामध्ये प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे मुबलक प्रमाणात असतात. सध्या लोकांमध्ये आरोग्याबद्दल जागरुकता वाढत आहे. त्यामुळे भरडधान्याची मागणी निर्माण झाली असून त्याला उत्तम बाजारपेठ तयार होत आहे. भरडधान्य पिके ही काटक असतात. त्यांना फार रासायनिक खते लागत नाहीत, महागडी कीटकनाशके आणि बुरशीनाशकेही लागत नाहीत. ही पिके कीड आणि रोगांना सहज तोंड देतात. त्यामुळे त्यांचा उत्पादन खर्च फार कमी असतो.

जमिनीनुसार भरडधान्याची निवड : भरडधान्यामध्ये बाजरी, ज्वारी, वरई, नाचणी, कोदरा, कंगणी (फॉक्सटेल मिलेट), राजगिरा या पिकांचा समावेश होतो. हलक्या, कमी खोलीच्या आणि मुरमाड जमिनीत बाजरी, नाचणी आणि भगर/ वरई/ राळा या पिकांचा समावेश होतो. बाजरी ही अत्यंत काटक असून कमी पाऊस आणि हलक्या, वालुकामय किंवा मुरमाड जमिनीत उत्तम येते. नाचणी म्हणजेच रागी हे पीक डोंगरउताराच्या, हलक्या आणि वरकस जमिनीतही चांगले तग धरते. मध्यम जमिनीत, पाण्याचा उत्तम निचरा होणाऱ्या जमिनीत खरीप ज्वारी, राजगिरा, रागी/ नाचणी, कोदो मिलेट म्हणजेच कोदरा ही पिके चांगला उतारा देतात. खरीप ज्वारी पाण्याचा निचरा होणारअया मध्यम जमिनीत खरीप ज्वारीचे चांगले उत्पादन देते. नाचणी किंवा रागी हे पीक मध्यम जमिनीत चांगले वाढते आणि त्याच्या दाण्यांचा आकार आणि वजन वाढते. यंदा कमी पाणी, कमी खत आणि प्रतिकुल हवामानात भरडधान्य चांगली येत असली तरी शेतकऱ्यांना स्वत: त्याचे सॉर्टिंग, ग्रेडिंग, पॅकेजिंग करुन त्याची बाजारपेठ शोधायला हवी. मागणी चांगल्या प्रमाणात असल्याने स्वत:च्या मालाचे चांगले ब्रँडिंग शेतकऱ्यांनी केल्यास उत्पादनाचा योग्य बाजारपेठ आणि ग्राहक उपलब्ध होऊ शकतो.

## जनावरांना होणारी विषबाधा; लक्षणे आणि उपाय

बरेचदा जनावरांच्या खाण्यात विषारी वनस्पती किंवा अखाद्य पदार्थ आल्यास त्यांना विषबाधा होते. युरिया कीटकनाशके, तणनाशक, उंदीरनाशक इत्यादी रासायनिक घटक किंवा त्याचे अंश जनावरांच्या खाद्यात गेल्यामुळे विषबाधा होते. यासाठी वेळीच योग्य उपाय केले नाही तर जनावरे मृत्युमुखी सुद्धा पडतात. जाणून घेऊ या विषबाधेची कारणे, लक्षणे आणि त्यावर करायचे उपाय.



युरियाची विषबाधा : युरियाचा पशू खाद्यामध्ये अधिक वापर. उदा. युरिया- मोलॅसिस, मुरघास, युरिया प्रक्रिया केलेल्या चाऱ्यासोबत सोयाबीन पेंड किंवा सोयाबीन भरडा खाऊ घालणे, युरिया किंवा इतर खतांची पोती जनावरांनी चाटणे, दुभत्या जनावरांना खुराकातून अधिक प्रमाणात युरिया खाऊ घालणे इत्यादी कारणामुळे ही विषबाधा होते. विषबाधेची लक्षणे - जनावरांच्या तोंडाला फेस येऊन त्यांना झटके येतात. जनावरांना नीट उभे राहता येत नाही. जनावरांची पोटफुगी होते. पोटामध्ये वेदना होतात. जनावरे सतत उठ बस करतात. थोडी थोडी लघवी करतात. जनावरांचे डोळे मोठे होतात, जनावरे बेशुद्ध होतात व शेवटी मृत्यू होतो. अधिक प्रमाणात युरिया खाल्ला असेल, तर अर्ध्या तासामध्येच मृत्यू होतो. उपचार - विषबाधा झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्वरित जनावरांना २ ते ८ लिटर ताक पाजावे. ताक उपलब्ध नसल्यास माठातील किंवा रांजणातील थंड पाणी पाजावे. मोठ्या जनावरांना ४० लिटर व लहान जनावरांना २० लिटर पाणी पाजावे. पोटातील हवा काढण्यासाठी जनावरांच्या तोंडात लगाम घालावा. यामुळे जनावरांचे तोंड सतत उघडे राहून पोटातील अमोनिया वायू बाहेर पडेल. शक्य तितक्या लवकर पशु वैद्यकाकडून उपचार करून घ्यावेत.

ज्वारीच्या कोवळ्या पोंग्याची विषबाधा : या विषबाधेला 'किरळ लागणे' असेही म्हणतात. ज्वारीच्या कोवळ्या पोंग्यामध्ये धुरीन नावाचा विषारी घटक असतो. जनावरांनी पोंगे खाल्यानंतर पोटात धुरीनपासून हायड्रोसायनिक ॲसिड तयार होते. हे हायड्रोसायनिक ॲसिड जनावरांमध्ये विषबाधा करते. लक्षणे - जनावरांनी ज्वारीचे कोवळे पोंगे जास्त प्रमाणात खाल्ले तर जनावरांचा मृत्यू होतो. कमी प्रमाणात पोंगे खाल्ले तर जनावराचे पोट फुगते, जनावर अस्वस्थ होते. श्वास व हृदयाचे ठोके वाढतात. श्वसनाला त्रास होतो, जनावरे थरथर कापते. उपचार -जावरांचे पोट फुगलेले दिसताच त्वरित पशु वैद्यकाच्या सल्ल्याने तातडीने उपचार करावेत.

ऑक्झॉलिकची विषबाधा : काळा बुरशीयुक्त कडबा जनावरांच्या खाण्यात आल्यास, रब्बी गहू- हरभरा पिकांत वाढणारे "ढोरकाकडा" नावाचे तण जनावरांनी खाल्ल्यास ही विषबाधा होते. लक्षणे - या विषबाधेमुळे रक्तात कॅल्शियमची कमतरता निर्माण होते. त्यामुळे अडखळत चालणे, कुंथणे, पोटफुगी, लघवी, थेंबाथेंबाने होणे किंवा अजिबात न होणे. गुदद्वारापासून ते मागील दोन पायांतून अंडकोषापर्यंत सूज आलेली आढळून येते. उपाय - बुरशीयुक्त कडबा अथवा गहू- हरभऱ्यांतील उपटून टाकलेले तण जनावरांना खाण्यास देऊ नये. विषबाधेचे प्रमाण कमी करण्यासाठी कॅल्शियमचे इंजेक्शन पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने द्यावे.

सरकीची विषबाधा : दुधाळ जनावरांना अथवा बैलांना सरकी देण्यात येते. कीटक प्रतिबंधक व अधिक उत्पादन देणाऱ्या कपाशीच्या सरकीमध्ये गॉसीपॉल या विषारी द्रव्याचे प्रमाण अधिक असते. गॉसीपॉलयुक्त सरकी जनावरांच्या सतत खाण्यात आल्यास दीर्घकालीन विषबाधा होण्याची शक्यता असते. उपाय - सरकी जनावरांना सतत खाण्यात देऊ नये. चार आठवडे सतत खाद्य दिल्यानंतर एखादा आठवडा खाद्य देऊ नये.

## कपाशीला द्या संतुलित खते

कपाशीच्या भरघोस उत्पादनासाठी सेंद्रिय खतांबरोबर, रासायनिक खतांचा वापर करणे अपरिहार्य आहे. यासोबतच मॅग्नेशियम आणि कॅल्शियम ही दुय्यम तर जस्त, बोरॉन, लोह, मँगनीज, मॉलिब्डेनम इ. सारख्या सूक्ष्म अन्नद्रव्यांची देखील थोड्या प्रमाणात आवश्यकता भासते. राज्यातील खानदेश व पश्चिम महाराष्ट्र साठी आणि विदर्भ व मराठवाडा विभागातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचा अवलंब केल्यास उत्पादन वाढेल व जमिनीची सुपिकता टिकून राहील.

एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन : सेंद्रिय खते, जीवाणू खते, हिरवळीची खते आणि रासायनिक खतांचा योग्य पीक अवस्थेत एकत्रित वापर करून अन्नद्रव्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

सेंद्रिय खते : सेंद्रिय खतांमुळे जमिनीचा पोत सुधारतो. जलधारणाशक्ती वाढते, हवा खेळती राहते आणि अन्नद्रव्य उपलब्ध व विद्राव्य करुन देणा-या जिवाणूची संख्या वाढण्यास मदत होते. जमिनीच्या भौतिक, रासायनिक व जैविक गुणधर्मात सकारात्मक बदल होतो. शेवटची वखरणी करण्यापूर्वी कोरडवाहू कापूस लागवडीसाठी ५ टन (१०-१२ गाड्या) शेणखत /कंपोस्ट खत अथवा २.५ टन गांडूळ खत व बागायती लागवडीसाठी १० टन (२०-२५ गाड्या) शेणखत /कंपोस्ट खत अथवा ५ टन गांडूळ खत मिसळावे. चांगले कुजलेले शेणखत/कंपोस्ट खत शेतात टाकल्यामुळे मॅग्रेशियम, झिंक इत्यादी सूक्ष्म मूलद्रव्यांचे प्रमाण वाढते. खते कमी असल्यास



लागवडीच्या वेळी प्रत्येक फुलीवर छोटा खड्डा घेऊन त्यात ओंजळभर शेणखत टाकावे व मातीत चांगले मिसळावे

जीवाणू संवर्धक : हवेतील नत्राचे स्थिरीकरण करुन नत्र खतांच्या मात्रेत बचत करण्यासाठी ॲझोटोबॅक्टर किंवा ॲझोस्पिरीलम या जीवाणू संवधर्काची प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम या प्रमाणात प्रक्रिया करावी. तसेच जमिनीतील मातीच्या कणांद्वारे धरुन ठेवलेले स्फुरद पिकांना उपलब्ध करुन देण्यासाठी स्फूरद विरघळणा-या जीवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी म्हणजे नत्र व स्फुरदयुक्त खताच्या मात्रेमध्ये जवळजवळ २५ ते ३० टक्के बचत होते.

रासायनिक खते : बागायती कपाशी ही रासायनिक खतांच्या मात्रांना योग्य प्रतिसाद देते म्हणून खतांचा पुरवठा ही एक महत्त्वाची बाब आहे.

दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्ये : नत्र, स्फुरद व पालाश या प्रमूख घटकाव्यतिरिक्त मॅग्नेशियम,गंधक या दुय्यम अन्नद्रव्याची लोह,जस्त,मॅगनीज आणि बोरॉन या सूक्ष्म अन्नद्रव्यांची सुद्धा गरज असते.माती परीक्षण करून कमतरता असलेल्या सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर तज्ञाच्या सल्ल्याने द्यावा.

सुक्ष्म अन्नद्रव्य देण्याची पद्धत : एक बैलगाडी शेणखत किंवा कंपोस्ट खत डेपो सावलीत करावा. यामध्ये ५ किलो झिंक सल्फेट, ५ किलो फेरस सल्फेट, ५ किलो मँगनीज सल्फेट, १ किलो बोरॉन टाकून डेपो एकवेळ खो-याने चांगला मिसळून घ्यावा. त्यानंतर ५० लिटर पाण्यात १ किलो ॲझॅटोबॅक्टर, १ किलो ट्रायकोडर्मा व ५ किलो पीएसबी मिसळून हे द्रावण या डेपोवर शिंपडावे. परत एकदा हा डेपो चांगला मिसळून घ्यावा. हा डेपो सावलीत ७ दिवस ओलसर राहिल या पद्धतीने ठेवावा.कापूस लागवडीनंतर १८ ते २१ दिवसांदरम्यान पडणाऱ्या पाळी बरोबर तो एक एकर क्षेत्रामध्ये जमिनीत मिसळावा.

रासायनिक खतांचा योग्य वापर : खतांची पहिली मात्र लागवडीच्या वेळी द्यावी. नत्रयुक्त खते विभागून द्यावीत. नत्रयुक्त खतांचा अवास्तव वापर टाळावा. नत्राच्या अतिरिक्त वापरामुळे उत्पादनामध्ये घट येते. मुख्य अन्नद्रव्यासोबत सूक्ष्मअन्नद्रव्ये मिसळून देऊ नयेत.

विद्राव्य खताची फवारणी : कपाशीला पाते लागण्याच्या वेळी (पेरणीनंतर साधारणत: ४५ दिवसानंतर) दोन टक्के डी.ए.पी. खताची (२०० ग्रॅम खत प्रति १० लिटर पाणी) व बोंडे लागण्याच्या वेळी (पेरणीनंतर ७५ दिवसांनी) दोन टक्के युरिया पाण्यात मिसळून (२०० ग्रॅम खत प्रति १० लिटर पाणी) पिकावर फवारणी केल्यास उत्पादनात वाढ होते. कोरडवाहू लागवडीमध्ये पीक वाढीच्या काळात पावसाची उघडीप असल्यास २ टक्के पोटॅशियम नायट्रेटची (२०० ग्रॅम खत प्रति १० लिटर पाणी) फवारणी १५ दिवसांच्या आत करावी.




# लोहा कंधार ३६१ एफ या राष्ट्रीय महामार्ग विथ इन एक्सपायर?

## १० वर्षापेक्षा अधिक काळ देशात कुठल्याही राष्ट्रीय महामार्गाचे काम अपूर्ण अवस्थेत नसेल?

पाथर्डी। प्रतिनिधी

लोहा कंधार ३६१ एफ खरवंडी कासार नवगण राजुरी या ५३ कि मी लांबीच्या रस्त्याचे काम तब्बल दहा वर्षाहून अधिक काळ लुटला तरी अपूर्ण अवस्थेत आहे २७० कोटी पेक्षा जास्त बजेट असलेल्या या रस्त्यासाठी अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम करून जिल्हा महामार्ग प्रमाणे रस्ता तयार करण्यात आला आहे त्यापेक्षा अधिक खरवंडी कासार बायपास ते ढाकणवाडी फाटा जवळपास तीन किलोमीटर दोन पदरी रस्ता रस्त्याच्या दुतर्फा साईट गटार ड्रेनेज वॉटर लाईन पथदिवे इत्यादी काम केले गेले नाही दहा वर्षाच्या कालखंडानंतर सिमेंट काँक्रिटीकरण रस्ता पूर्णपणे नादुरुस्त आणि उखडलेला असल्याने त्यावर पुन्हा डांबराचे अर्धवट लेयर टाकले आहे खरवंडी कासार मालेवाडी श्रीपतवाडी मुंगूसवाडे भालगाव येळब येथील बहुतांश शेतकऱ्यांच्या जमिनीचा मावेजा अद्यापपर्यंत दिला गेला नाही एसी शेख कन्ट्रक्शन नामक ठेकेदार पूर्णपणे हा रस्ता राष्ट्रीय महामार्गचा दर्जाचा रस्ता करण्यासाठी उदासीन असल्याचे दिसत आहे यामुळे मालेवाडी गावातील स्थानिक शेतकऱ्यांनी स्वाक्षऱ्यांचे निवेदन देऊन राष्ट्रीय महामार्ग मुख्य कार्यकारी अभियंता मुंबई संतोष शेलार यांच्याकडे लिखित स्वरूपात तक्रार दिली आहे जोपर्यंत खरवंडी कासार ते नवगण राजुरी या ५३ की.मि.लांबी असलेल्या रस्त्याचे राष्ट्रीय महामार्गाचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्ण होत नाही शेतकऱ्यांचा मावेजा मिळत नाही तोपर्यंत काम पूर्णत्वाचा दाखला आणि ठेकेदाराची देयके देऊ नये असे केल्यास खरवंडी कासार ते भालगाव या चार ते पाच गावातील शेतकरी मिळून सामूहिक अमरण उपोषण आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

खरवंडी कासार बायपास ते ढाकणवाडी फाटा ते नवगण राजुरी या ५३ किलोमीटर राष्ट्रीय महामार्गाच्या रस्ता कामाच्या अनुषंगाने रस्त्याच्या दुतर्फा साईड गटार ड्रेनेज वॉटर लाईन पथदिवे आणि रस्त्याच्या दुतर्फा राष्ट्रीय महामार्ग निकषाप्रमाणे झाडे लावणे आणि पूर्णपणे रस्ता उखडलेला असल्याने सिमेंट काँक्रिटीकरणाचे लेयर टाकने तसेच या रस्त्याच्या २७० कोटी रुपयांच्या बजेट राष्ट्रीय महामार्ग अंदाजपत्रकात दिल्याप्रमाणे पूलांची संख्या किती त्याप्रमाणे पूल बांधणी करून पूर्णपणे रस्ता राष्ट्रीय महामार्ग प्रमाणे तयार करून देणे बंधनकारक आहे.

लोहा कंधार ३६१एफ खरवंडी कासार ते नवगण राजुरी या रस्त्याच्या निकृष्ट कामाची लेखी तक्रार मुंबई कोकण भवन राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे प्राप्त झाली आहे त्या अनुषंगाने अपर सचिव त्रीसदस्य चौकशी समिती नेमून मागील दहा वर्षात शेतकऱ्यांचा राहिलेला मावेजा खरवंडी कासार ते नवगण राजुरी नूतन लेयर टाकून सिमेंट काँक्रिटीकरण साईड गटार वॉटर ड्रेनेज लाईन पथदिवे आणि अंदाजपत्रकात दिल्याप्रमाणे नवीन पूल बांधणे राष्ट्रीय मार्ग नूतनीकरण केल्याशिवाय कम्प्लिशन सर्टिफिकेट आणि बिल अदा केले जाणार नाहीत असे आदेश निर्गमित केले जातील

–संजय घावटे

(उपसचिव राष्ट्रीय महामार्ग कोकण विभाग मुंबई)

# कांद्याचे माहेरघर बनतेय वैजापूर:एका महिन्यामध्ये २५.४६ कोटी उलाढाल

## जूनमध्ये १५,७७४ शेतकऱ्यांकडून २.२२ लाख क्विंटल कांदा विक्री



वैजापूर। प्रतिनिधी

एकेकाळी कांद्याची विक्री करण्यासाठी वैजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना अंदरसूल, येवला, राहाता, घोडेगाव, नाशिक बाजार समित्यांचा आधार घ्यावा लागत होता. मात्र आता वाढती आवक, व्यापाऱ्यांमधील स्पर्धा, पारदर्शक लिलाव आणि विक्रीनंतर तात्काळ मिळणारे पेमेंट या कारणांमुळे वैजापूर बाजार समिती कांदा उत्पादकांचे विश्वासाचे माहेरघर बनत आहे. जून महिन्यात १५,७७४ शेतकऱ्यांनी २,२२,३३९ क्विंटल कांद्याची विक्री केली. या व्यवहारातून २५ कोटी ४६ लाख ४३ हजार ५१ रुपयांची उलाढाल झाली, तर समितीला २६ लाख ७३ हजारांचे उत्पन्न मिळाले आहे.

प्रतिक्विंटल १,२०० ते २,४०० दर मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. दररोज वाढणारी आवक आणि व्यापाऱ्यांची संख्या पाहता वैजापूरची बाजारपेठ आता केवळ तालुक्यापुरती मर्यादित राहिलेली नसून मराठवाड्यातील प्रभावी कांदा व्यापार केंद्र म्हणून पुढे येत आहे. पारदर्शक समितीकडे अधिक कल आहे. लिलाव, विक्रीनंतर तात्काळ पेमेंटमुळे शेतकऱ्यांचा कांदा विक्रीसाठी येत आहे. तत्काळ पेमेंटमुळे फायदा पूर्वी कांदा विकण्यासाठी बाहेरच्या बाजार समित्यांमध्ये जावे लागायचे. त्यामुळे वाहतूक खर्च आणि वेळ दोन्ही वाया जात होते. आता वैजापूर बाजार समितीतच चांगला भाव, पारदर्शक लिलाव आणि तत्काळ पेमेंट मिळत असल्याने आमचा मोठा फायदा होत आहे. – अशोक वेळजकर, शेतकरी जूनमधील कांदा व्यवहार .कांदा विक्री करणारे शेतकरी : १५,७७४ .एकूण कांदा आवक : २,२२,३३९ क्विंटल .एकूण उलाढाल : २५,४६,४३,०५१ .बाजार समितीचे उत्पन्न : २६,७३,७५६ .किमान भाव : १,२०० प्रतिक्विंटल .कमाल भाव : २,४०० प्रतिक्विंटल .दररोज सरासरी आवक : ७,४११ क्विंटल .दररोज सरासरी व्यवहार : सुमारे ८४.८८ लाख .सरासरी मिळणारा दर : १,२०० रु. क्विंटल बाजारपेठेचा विस्तार वैजापूरची बाजारपेठ मराठवाड्यातील प्रमुख कांदा बाजारपेठ म्हणून विकसित करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांना योग्य भाव, जलद लिलाव आणि तात्काळ पेमेंट मिळावे यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. व्यापाऱ्यांना आकर्षित करून बाजारपेठेचा विस्तार केला जाईल.

# फुलंब्री येथील पेट्रोल पंपासमोर कार, दुचाकीच्या अपघातामध्ये तरुणाचा मृत्यू



फुलंब्री। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर-जळगाव राष्ट्रीय महामार्गावर फुलंब्री येथील मानकापे पेट्रोल पंपासमोर कार आणि दुचाकीच्या अपघातात १७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास घडला. सुमित गजानन डकले (रा. डोंगरगाव कवाड, ता. फुलंब्री) असे मृताचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुमित हा आपल्या आईला दुचाकीवरून (एमएच २० सीके ८१२१) ने घेऊन फुलंब्री येथे आला होता. आईला उतरवून तो महामार्गावरील मानकापे पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्यासाठी वळत होता. याच वेळी समोरून भरधाव वेगात येणाऱ्या कारने (एमएच १२ वायडी ५१००) जोरदार धडक झाली. अपघातानंतर जगतगुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी श्रीक्षेत्र नाणीजधाम संस्थानच्या रुग्णवाहिकेचे चालक अमोल बनकर यांनी तत्परता दाखवली. त्यांनी जखमी सुमितला तातडीने फुलंब्री येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

मात्र, प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले. तिथे उपचार सुरू असतानाच सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास त्याची प्राणज्योत मालवली. त्याच्या पश्चात आई, आजी आणि भाऊ असा परिवार आहे. या प्रकरणी फुलंब्री पोलिस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे. मृत सुमित हा पोलिस भरतीची तयारी करत होता.

पोलिस भरतीचे स्वप्न राहिले अधुरे फुलंब्री नगरपंचायत हद्दीत महामार्गाच्या दुभाजकावर सुशोभीकरणासाठी विविध झाडे आणि झुडपे लावण्यात आली आहेत. मात्र, हीच झाडे आता वाहनधारकांसाठी मृत्यूचा सापळा ठरत आहेत. दरम्यान, सुमित हा पोलिस भरतीची तयारी करीत होता. मात्र, या अपघातामुळे त्याचे स्वप्न अधुरे राहिले असून, त्याच्या निधनामुळे हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# खरवंडी पोलीस चौकीत नव्याने नियुक्त केलेला पोलीस हा लिंगपिसाट व गुंड माफिया यांचा सर्वात मोठा दलाल?

## पीआय आनंद कोकरे तुम्ही कॅरेक्टरलेस कर्मचाऱ्यांना अवैध धंदे गुंड माफिया यांच्यासाठी ढाल बनवत आहात?

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी पोलीस ठाण्यातील हप्ते खोरीचे चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष एजंट विनोद व खरवंडी कासार पोलीस चौकीतील नव्याने नियुक्त केलेला एक पोलीस कर्मचारी जो काही महिन्यापूर्वी महाराष्ट्रात गाजलेली अशोक थोरात प्रकरणात इन्स्टील फाईल तसेच पाथर्डी पोलीस ठाण्यातील एक बहुरूपीया पोलीस कर्मचारी खरवंडी कासार पोलीस चौकीत पुन्हा एकदा नव्याने नियुक्त केला आहे तो स्वतः लिंगपिसाट असून तब्बल लाखो रुपये देऊन पीडित महिलेचे त्याने तोंड बंद केले आहे म्हणून प्रकरण दाबले गेले परंतु अशा घटना कायमस्वरूपी दाबत नाहीत खरवंडी कासार पोलीस चौकीच्या जेडूसिएल अंतर्गत चालणारे अवैध धंदे मटके बनावट दारू गांजा अवैध वाळू तस्कर गुटखा माफिया या सगळ्या माफियांच्या मुकुट कवच रक्षक करणारा पोलीस कर्मचारी सर्वात मोठा रीशवतखोर असून तो खरवंडी कासार पोलीस चौकीत नव्याने नियुक्त केला असला तरी त्याची सेवा पुस्तकेची माहिती पब्लिक शो करावी संबंधित पोलीस कर्मचारी कागदोपत्री ड्युटी करत असून प्रत्यक्षात तो कधीही ड्युटीला हजर राहत नाही फक्त महिन्यासाठी अवैध धंदे करणारे गुंड माफिया यांच्याकडून लाखो रुपयांचे हप्ते जमा करून स्वतःची करोडो रुपयांची माया जमवत आहे संबंधित पोलीस कर्मचारी खरवंडी कासार येथील कुठल्या कुठल्या गुंड माफिया व अवैध धंदे करणारे यांच्याकडून हप्तेखोरी घेतो त्याचे संबंधित सर्व पुरावे आहेत याप्रकरणी लवकरच एस पी ममुका सुदर्शन यांच्याकडे व गृहमंत्रालय मुंबई यांच्याकडे लिखित तक्रार देऊन संबंधित पाथर्डी तालुक्यात एजंट विनोद आणि खरवंडी कासार पोलीस चौकीच्या ज्युडेशल अंतर्गत चालणाऱ्या सर्व अवैध धंद्यावाल्यांचा मुखिया असलेला तो भाऊचोर पोलीस कर्मचारी याचे निलंबन करण्यासाठी तक्रार करण्यात येणार आहे.

# हिंगोलीत हायवेवर थरार: कारवाडी उड्डाणपुलाजवळ दुचाकीस्वाराला लाथ मारून पाडले

हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली तालुक्यातील कारवाडी शिवातील उड्डाणपुला जवळ दुचाकीवर आलेल्या तिघांनी एका दुचाकीस्वारास मारहाण करून लुटल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी तिघांवर हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात शुक्रवारी ता. १० गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी आता त्या तीन चोरट्यांचा शोध सुरु केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगोली तालुक्यातील पिंपरखेड येथील अविनाश वाढवे हे हिंगोली येथे दुचाकी दुरुस्तीचे काम करतात. त्यासाठी दररोज पिंपरखेड येथून हिंगोली येथे येतात अन रात्री काम आटोपून परत गावाकडे जातात.

दरम्यान, नेहमी प्रमाणे अविनाश हे मंगळवारी ता. ७ रात्री साडे नऊ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या दुचाकी वाहनावर हिंगोलीकडून पिंपरखेड येथे जात होते. त्यांचे दुचाकी वाहन कारवाडी शिवारातील उड्डाणपुला जवळ आले असतांना दुचाकीवर आलेल्या तीन चोरट्यांनी त्यांच्या दुचाकी वाहनाला लाथ मारून खाली पाडले. त्यामुळे अविनाश यांचे वाहनावरील नियंत्रण सुटले अन ते खाली पडले. यावेळी चोरट्यांनी त्यांना मारहाण करण्यास सुरवात केली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे अविनाश घाबरुन गेले. तिघांच्या मारहाणीपुढे ते प्रतिकार करू शकले नाही. यावेळी चोरट्यांनी त्यांच्या जवळील १२ हजार रुपये रोख व एक मोबाईल असा २५ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल घेऊन चोरट्यांनी पळ काढला. त्यांनतर काही वेळाने अविनाश यांनी गावात जाऊन सदर प्रकार सांगितला. त्यानंतर त्यांनी शुक्रवारी ता. १० हिंगोली ग्रामीण पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी तीन चोरट्यां विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपाधिक्षक सतिष वाघ, पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुट्टे, उपनिरीक्षक राहुल घुले, महिला पोलिस उपनिरीक्षक श्रीदेवी वग्गे, जमादारा बाळासाहेब खोडबे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. उपनिरीक्षक घुले पुढील तपास करीत आहेत.

# विठ्ठला, भरपूर पाऊस पडू दे आणि माझ्या मराठवाड्यातील बळीराजाला सुखी ठेव-बोराडे



मंठा (प्रतिनिधी )

आषाढी वारीच्या पावन पर्वावर तसेच निज जेष्ठ क्र १३ प्रदोष या ब्रह्ममुहूर्तावर श्रीक्षेत्र पंढरपूर येथे शिवसेना जिल्हाप्रमुख तथा मंठा बाजार समितीचे सभापती ए. जे. पाटील बोराडे यांनी आज रविवार ता. १२ रोजी सकाळी सपत्नीक पांडुरंगाची विधिवत आणि भक्तीभावाने महापूजा केली. यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावर्षी पाऊस नसल्याने मराठवाड्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. गेल्या काही वर्षापासून शेतकरी अवकाळी तर कधी दुष्काळ आणि नापीकेने त्रस्त आहेत. त्यांना दिलासा मिळावा यासाठी चांगला पाऊस पडू दे आणि माझ्या मराठवाड्यातील बळीराजाला सुखी ठेव अशी आर्त प्रार्थना ए. जे. पाटील बोराडे यांनी पांडुरंगाच्या चरणी केली.यावेळी माजी पंचायत समिती सभापती सौ सुलभाताई बोराडे, माजी नगराध्यक्ष सौ मीराताई बोराडे, आसाराम उर्फ संतदादा बोराडे, डॉ. संग्राम बोराडे, ओंकार बोराडे, डॉ. आदित्य बोराडे यांची उपस्थिती होती.

# पंढरीची वारी : वृद्ध वारकऱ्यांची काळजी घेणे हीच खरी विठ्ठलसेवा!

पंढरपूरची वारी ही महाराष्ट्राच्या संस्कृतीचे, भक्तीचे आणि माणुसकीचे जिवंत प्रतीक आहे. शेकडो वर्षांपासून लाखो वारकरी ''ज्ञानोबा-तुकाराम''चा गजर करत पंढरीची वाट चालत आहेत. या वारीचे वैशिष्ट्य केवळ तिची प्राचीन परंपरा किंवा लाखोंचा सहभाग नाही, तर प्रत्येक वारकरी दुसऱ्या वारकऱ्याला ''माऊली'' म्हणून संबोधतो, यात आहे. या एका शब्दात समता, प्रेम, आपुलकी आणि परस्परांची जबाबदारी दडलेली आहे. यावर्षीची वारी संपत आली असताना एक बातमी मनाला चटका लावून गेली. वारीत सहभागी झालेल्या एका वृद्ध वारकऱ्याचा मृत्यू झाला. अशा घटना फार मोठ्या संख्येने घडत नाहीत; परंतु एक जरी जीव गेला, तरी तो केवळ आकडा राहत नाही. तो कोणाचा तरी वडील असतो, कोणाचा आजोबा असतो, कोणाचा भाऊ असतो आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तो विठ्ठलाचा भक्त असतो. ही घटना कोणावर दोषारोप करण्यासाठी नव्हे, तर आपण सर्वांनी आत्मपरीक्षण करण्यासाठी पुरेशी आहे.

हा लेख सरकारवर टीका करण्यासाठी नाही. प्रशासन आपले काम करत असते, दिंडी व्यवस्थापन आपले काम करत असते. पण लाखो लोकांच्या या महासागरात काही



गोष्टी अशा असतात, ज्या कोणत्याही यंत्रणेपेक्षा माणुसकीने अधिक चांगल्या प्रकारे सांभाळता येतात. वृद्ध वारकऱ्यांची काळजी ही त्यापैकीच एक.वारीत अनेक आजी-आजोबा सहभागी होतात. काहींचे वय सत्तर, ऐंशी किंवा त्याहून अधिक असते. शरीर थकलेले असते, गुडघे दुखत असतात, दृष्टी कमी झालेली असते, रक्तदाब, मधुमेह किंवा इतर व्याधी असतात. तरीही ''यंदाची वारी चुकवायची नाही'' या श्रद्धेने ते घराबाहेर पडतात. त्यांना विठ्ठलाचे दर्शन महत्त्वाचे वाटते; पण त्याहून महत्त्वाची असते ती संतांनी दाखविलेल्या मार्गावर चालण्याची ओढ. अशा वेळी आपण प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजेआपल्या शेजारी चालणाऱ्या त्या वृद्ध वारकऱ्याकडे आपण खरोखर लक्ष देतो का? आपल्या दिंडीत एखादे आजोबा शांतपणे चालत असतील, तर त्यांच्याशी दोन शब्द बोलूया. ''आजोबा, तब्येत ठीक आहे ना?'', ''पाणी घेणार का?'', ''थोडा वेळ सावलीत बसूया का?'' एवढी साधी विचारपूसही त्यांना मानसिक आधार देऊ शकते. अनेक वृद्ध स्वतःहून मदत मागत नाहीत. त्यांना इतरांना त्रास द्यायचा नसतो. त्यामुळे त्यांची गरज आपण ओळखली पाहिजे. कधी एखाद्या आजींना पाण्याची बाटली उघडता येत नाही. कधी पिशवीचे वजन जड वाटते. कधी चप्पल तुटते. कधी उन्हामुळे डोके गरगरते. कधी फक्त दोन मिनिटे बसून श्वास घेण्याची गरज असते. या कोणत्याही प्रसंगात आपण पुढे होऊन मदत केली, तर ती केवळ सामाजिक कृती राहणार नाही; ती विठ्ठलाची सेवा ठरेल. दिंडी व्यवस्थापनालाही येथे महत्त्वाची भूमिका आहे. दिंडी म्हणजे केवळ शिस्तबद्ध चालण्याची व्यवस्था नाही. दिंडी म्हणजे एक कुटुंब आहे. कुटुंबात जसे ज्येष्ठांची काळजी घेतली जाते, तसेच दिंडीतही झाले पाहिजे. प्रत्येक दिंडीत काही तरुणांनी स्वयंस्फूर्तीने ज्येष्ठ वारकऱ्यांकडे लक्ष ठेवण्याचा संकल्प केला, तर अनेक अडचणी टाळता येतील. मागे राहणाऱ्या वृद्धाला हात देणे, त्याला विश्रांती सुचवणे, त्याला पाणी देणे किंवा गरज पडल्यास इतरांना मदतीसाठी बोलावणेइतके केले तरी मोठा फरक पडू शकतो. वारी आपल्याला केवळ भक्ती शिकवत नाही; ती वर्तनही शिकवते. संत ज्ञानेश्वरांनी विश्वकल्याणाची प्रार्थना केली. संत तुकारामांनी दया, क्षमा आणि परोपकार यांचा संदेश दिला. संतांनी कधीही केवळ देवाकडे पाहायला सांगितले नाही; त्यांनी देव माणसात पाहायला शिकवले. मग आपल्या शेजारी चालणाऱ्या थकलेल्या वृद्ध वारकऱ्यात विठ्ठल दिसला, तर त्याला आधार देणे हेच संतांच्या शिकवणीचे पालन ठरेल. वर्तनशास्त्रात एक संकल्पना सांगितली जाते. मोठ्या गर्दीत एखादी व्यक्ती अडचणीत असली, तर अनेकांना वाटते की ''कोणीतरी दुसरा मदत करेल.'' त्यामुळे प्रत्यक्षात मदत उशिरा मिळते. वारीत ही मानसिकता बदलायला हवी. ''कोणीतरी पाहील'' असे न म्हणता ''मी पाहतो'', ''मी मदत करतो'', ''मी पाणी देतो'', ''मी सोबत चालतो'' असे म्हणणारे वारकरी वाढले, तर वारी अधिक सुंदर होईल. वृद्ध वारकरी आपल्यासाठी ओझे नाहीत. ते वारकरी परंपरेचे चालते-बोलते इतिहास आहेत. त्यांनी दशकानुदशके वारी केली आहे. त्यांनी अभंग जपले, दिंडी जपली, परंपरा जपली आणि आज तीच परंपरा आपल्या हातात दिली आहे. त्यामुळे त्यांच्या शेवटच्या काही वाऱ्या सुरक्षित, आनंदी आणि सन्मानाने व्हाव्यात, ही आपली नैतिक जबाबदारी आहे. या वारीत एक छोटासा संकल्प करूया. आपल्या आजूबाजूला चालणाऱ्या किमान एका वृद्ध वारकऱ्याची जबाबदारी आपण स्वतः घेऊया. दिवसातून काही वेळा त्यांची विचारपूस करूया. त्यांना पाणी देऊया. त्यांचे सामान काही अंतर स्वतः वाहूया. ते मागे पडले, तर त्यांच्यासोबत चालूया. ते पडले, तर तत्काळ उभे करूया. त्यांची तब्येत बिघडली, तर विलंब न करता मदत मिळवून देऊया. या छोट्या कृतींसाठी पैसा लागत नाही; लागते ती फक्त माणुसकी. वारीचा खरा अर्थ पंढरपूर गाठण्यात नाही; तर प्रवासात एकमेकांना आधार देण्यात आहे. विठ्ठलाच्या दर्शनासाठी चालणारी पावले तेव्हाच पूर्ण अर्थाने पवित्र ठरतात, जेव्हा ती एखाद्या थकलेल्या वारकऱ्याजवळ थांबतात. मंदिरातील विठ्ठलाला नमस्कार करणे सोपे आहे; पण रस्त्यावरच्या विठ्ठलरूप वारकऱ्याला आधार देणे अधिक मोठे पुण्य आहे. चला, यंदा प्रत्येक दिंडी, प्रत्येक वारकरी आणि प्रत्येक स्वयंसेवक एक संकल्प करूयाआपल्या दिंडीत एकही वृद्ध वारकरी एकटा पडणार नाही. त्याला पाणी, आधार, आपुलकी आणि वेळेवर मदत मिळेल. कारण वृद्ध वारकऱ्यांची काळजी घेणे ही दया नव्हे, उपकार नव्हेत; तीच खरी विठ्ठलभक्ती आहे.



-डॉ. भारत द. कऱ्हाड
प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.

# महाजनवाडी जिल्हा परिषद शाळेची इमारत धोकादायक

## १९५४ सालची शाळा जीर्णावस्थेत; १२५ विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

लिंबागणेश । प्रतिनिधी

जिल्हा परिषद शाळांमध्ये दररोज 'पसायदान' म्हणत विश्वकल्याणाची प्रार्थना करणाऱ्या विद्यार्थ्यांना सुरक्षित व सुसज्ज शैक्षणिक वातावरण मिळेल का, असा प्रश्न महाजनवाडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या दुरवस्थेमुळे निर्माण झाला आहे. बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत १९५४ पूर्वी बांधण्यात आली असून ती सध्या अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत आहे. या शाळेत शिक्षण घेणारे






सुमारे १२५ विद्यार्थी व शिक्षकांचा जीव धोक्यात असल्याने नवीन वर्गखोल्या बांधण्यासाठी जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या निधीतून तातडीने तरतूद करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

शाळेच्या वर्गखोल्या गळक्या असून भिंतींचे खपले पडत आहेत. पावसाळ्यात विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून शिक्षण घ्यावे लागत असल्याने तातडीने नवीन इमारतीचे बांधकाम करणे आवश्यक असल्याचे डॉ. ढवळे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

### इमारतीबाबत दरवर्षी अहवाल- मुख्याध्यापक आंधळे

महाजनवाडी येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत अत्यंत जीर्ण झाली असून पावसाळ्यात छत गळते, भिंतींचे प्लास्टर कोसळते. ग्रामस्थांनी तात्पुरती डागडुजी केली असली तरी ती अपुरी आहे. शाळेच्या धोकादायक अवस्थेबाबत दरवर्षी पावसाळ्यापूर्वी वरिष्ठ कार्यालयाला अहवाल सादर करण्यात येतो; मात्र अद्याप नवीन इमारतीसाठी कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याची माहिती मुख्याध्यापक आंधळे एस. डी. यांनी दिली.

### नवीन वर्गखोल्यांसाठी शासनाने निधी द्यावा - सरपंच गिरी

ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या लोकसहभागातून शाळेत तात्पुरती दुरुस्ती, पाणी फिल्टर, प्रिंटर, झेरॉक्स मशीन, स्टेज आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मात्र मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांचे नवीन बांधकाम करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे आवश्यक निधी उपलब्ध नसल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांनी तातडीने निधी मंजूर करावा, अशी मागणी सरपंच विश्वंभर गिरी यांनी केली.

# राम मंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या चौकशीच्या मागणीसाठी सत्याग्रह आंदोलन

माजलगांव । प्रतिनिधी

माजलगांव येथील हिंदू रामभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या अयोध्या राम मंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहार व चोरीच्या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी रविवारी (दि. १२ जुलै) सकाळी ११.३० वाजता माजलगांव येथील त्रिदेव मंदिर परिसरात रघुपती राघव राजाराम या भजनाच्या माध्यमातून शांततापूर्ण सत्याग्रह आंदोलन करण्यात




आले.

आंदोलनकर्त्यांनी या कथित प्रकरणातील सर्व संबंधित बाबींची निष्पक्ष चौकशी करून, पडद्यामागील सूत्रधारांचाही शोध घ्यावा, अशी मागणी केली. तसेच काही आंदोलनकर्त्यांनी या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप झाल्याचा आरोप करत त्या अनुषंगानेही चौकशी करण्याची मागणी केली.

सत्याग्रहादरम्यान भगवान श्रीरामाच्या प्रतिमेसमोर भजन, प्रार्थना आणि घोषणांच्या माध्यमातून आंदोलन करण्यात आले. राम मंदिरातील कथित गैरव्यवहाराची सत्यता जनतेसमोर यावी, दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई व्हावी अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी संबंधित यंत्रणांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता पारदर्शक,

पान ३ वर

# बीडमध्ये आदिशक्ती संत मुक्ताबाई पालखीतील वारकऱ्यांसाठी चरणसेवा; डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते उपक्रमाचे उदघाटन

बीड । प्रतिनिधी

आदिशक्ती संत मुक्ताबाई यांच्या पालखीचे बीड शहरातील बालाजी मंदिर येथे मुक्काम असताना वारकऱ्यांच्या सेवेसाठी मुख्यमंत्री सहाय्यक निधी कक्ष, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि भाजप बीड यांच्या संयुक्त विद्यमाने चरणसेवेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पालखी सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या चरणसेवा



उपक्रमाचे उद्घाटन भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी आदिशक्ती संत मुक्ताबाई यांच्या पवित्र पालखीचे मनोभावे दर्शन घेत वारकरी संप्रदायाच्या अखंड भक्तीपरंपरेला अभिवादन केले. याप्रसंगी वारकऱ्यांना सेवा देत त्यांच्याशी संवाद साधण्यात आला. वारकरी संप्रदायाची सेवा ही समाजसेवेचेच एक पवित्र रूप असून अशा उपक्रमांमुळे भक्तांना दिलासा मिळतो, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मुख्यमंत्री सहाय्यक निधी कक्ष आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वारकऱ्यांच्या सेवेसाठी सर्वांनी उत्साहाने सहभाग नोंदवत उपक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

# कै.विठ्ठल जाधव यांच्या स्मरणार्थ वारकऱ्यांची २७ वर्षांची अखंड आरोग्यसेवा

## २०० वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, मेडिकल किट व फराळाचे वाटप



गेवराई । प्रतिनिधी

'साधुसंत येती घरा, तोचि दिवाळी दसरा' या संतवचनाचा प्रत्यय देत कै. विठ्ठल जाधव यांच्या स्मरणार्थ पुणे शहरात गेल्या तब्बल २७ वर्षांपासून अखंडपणे वारकरी आरोग्यसेवेचा उपक्रम राबविला जात आहे. संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील मालेगाव येथील माऊलींच्या रथामागील दिंडी क्रमांक १९६ पुण्यात दाखल झाल्यानंतर मार्केट यार्ड परिसरात या सेवाभावी उपक्रमाचे यंदाही उत्साहात आयोजन करण्यात आले. या आरोग्य शिबिरात सुमारे २०० वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर आवश्यक औषधांसह मेडिकल किटचे वाटप करण्यात आले. तसेच वारकऱ्यांच्या प्रवासातील थकवा दूर व्हावा, यासाठी केळी, बिस्किटे आणि विविध फळांचा

पान ३ वर

# जिल्हा रुग्णालयात जागतिक लोकसंख्या दिन साजरा




बीड । प्रतिनिधी

येथील जिल्हा रुग्णालयात प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश चव्हाण यांच्या उपस्थितीत जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला.

यावेळी बोलतांना जिल्हा रुग्णालयाच्या मेट्रन श्रीमती रमा गिरी यांनी सांगितले की, लोकसंख्या

पान ३ वर

# श्रीराम मंदिर देणगी गैरव्यवहाराच्या निषेधार्थ काँग्रेसचा रघुपती राघव राजाराम सत्याग्रह संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्रीराम मंदिर उभारणीसाठी जमा झालेल्या देणगीतील गैरव्यवहाराच्या निषेधार्थ महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी व बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार आज अंबाजोगाई तालुका काँग्रेसच्या वतीने रघुपती राघव राजाराम सत्याग्रह आंदोलनखडकपुरा येथील श्री राम मंदिर समोर मोठ्या शांततेत संपन्न झाला.

देशभरात श्रीराम मंदिर




उभारणीसाठी जनतेकडून मोठ्या प्रमाणात देणगी गोळा करण्यात आली. मात्र या देणगीमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचे आरोप होत आहेत. याच पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने

पान ३ वर

# संत मुक्ताबाई पालखीचे दर्शन घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांनी कबाड गल्लीत घेतला प्रसाद

बीड । प्रतिनिधी

संतश्रेष्ठ मुक्ताबाई पालखीचे बीड शहरांमध्ये आगमन झाले आज मुक्कामी संत मुक्ताबाई पालखीचे आ संदीप क्षीरसागर यांनी भक्ती भावे दर्शन यावेळी त्यांच्या समवेत माजी आ सय्यद सलीम छवाचे जिल्हाध्यक्ष अशोक रोमन उपस्थित होते यानंतर कबाड गल्ली येथे परंपरेनुसार मुक्ताबाई पालखीच्या आगमनानिमित्त अन्नदान कार्यक्रम असतो त्या अन्नदान कार्यक्रमात प्रसादाचा लाभ घेतला या कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन आदर्श मित्र मंडळ कबाड गल्ली यांनी केले होते.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी संत मुक्ताबाई पालखीचे बीड शहरात आगमन झाले मोठ्या उत्साहात बीडकरांनी या पालखीचे स्वागत केले





अनेकांनी मनोभावे दर्शन घेतले पालखीच्या मुक्कामानंतर प्रतिवर्षाप्रमाणे कबाली येथील पंचांच्या वाड्यात व कबाड गल्ली आदर्श मित्र मंडळाच्या वतीने गेल्या अनेक वर्षानुवर्ष सुरू असलेली परंपरा आजही कायम ठेवत अन्नदानाचा कार्यक्रम ठेवला होता या अन्नदानाच्या कार्यक्रमाला आमदार संदीप क्षीरसागर माजी आमदार सय्यद सलीम यांनी उपस्थिती दर्शतमहा प्रसादाचा लाभ घेतला यावेळी अन्नदानाच्या कार्यक्रमाचे नियोजन आदर्श मित्र मंडळ कबाड गल्लीयांनी केले होते यावेळी वारकऱ्यांनीही अन्नदानाचा लाभ घेतला अन्नदानाची ही परंपरा गेल्या अनेक वर्षापासून अखंडपणे सुरू आहे आणि ही परंपरा कबाड गल्ली येथील मित्र मंडळाने जोपासली आहे

# नामकरण झाले मात्र बीडकरांसाठी सुभाष रोडच कायम - शहर बचाव मंच

## संत मुक्ताई पालखीच्या निमित्ताने स्वच्छतेचे वाभाडे रस्त्या रस्त्यांवर

बीड । प्रतिनिधी

परम श्रद्धेय श्री संत मुक्ताई पालखीच्या निमित्ताने बीड शहरातील स्वच्छतेचे कसे तीन तेरा नऊ बारा वाजले आहेत हे सर्वांसमोर आले आहे. नगरपालिकेच्या नेता - प्रतिनिधींचे अक्षरशः वाभाडे निघालेले आहेत.

नुकत्याच झालेल्या बीड नगरपालिका निवडणुकीमध्ये बीड शहराच्या विकासाच्या मोठ्या मोठ्या गप्पा



ठोकणारे सर्वच लोकप्रतिनिधी हे नियमित स्वच्छता मोहिम राबविण्यामध्ये असफल ठरले आहेत. अक्षरशः परम श्रद्धेय आदरणीय श्री संत आई मुक्ताई यांच्या पालखीच्या पूर्वतयारीच्या पार्श्वभूमीवर यांना बीड शहराची व 'मुक्ताई' पालखी मार्गाची स्वच्छता देखील करणे शक्य झाले नाही. यानिमित्ताने त्यांची कार्यक्षमता चव्हाट्यावर आली आहे तसेच नगरपालिकेच्या कारभारावरच फार मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. मुक्ताई पालखीची पूर्वतयारी करण्यापेक्षा जनतेला संघर्षा मधून मिळालेल्या रस्त्यांच्या कामांचे श्रेय लाटण्यामध्ये हे सर्वजण व्यस्त होते, यांना त्यात मजा वाटत होती. खरंच बीड नगरपालिकेची गत अशी झाली आहे की एक नाही कामाचा आणि सारा गाव 'मामाचा'...

यातच दरवर्षीप्रमाणे मुक्ताईची पालखी येणार आहे याचा या सगळ्यांना विसरत पडला होता. आज खरचंच पालकमंत्री दि. स्वर्गीय अजित दादा पवार हयात असते तर नगरपालिकेच्या

पान ३ वर

# मुक्ताई पालखीतील वारकऱ्यांच्या सेवेसाठी शिवसेनेतर्फे मोफत आरोग्य व औषधोपचार शिबिर!

बीड । प्रतिनिधी

संतश्रेष्ठ मुक्ताई पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांच्या सेवाभावातून शिवसेनेच्या वतीने रविवार, दि. १२ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.०० ते ३ वाजे पर्यंत मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे घेण्यात आले आहे. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाप्रमुख संतोष जाधव यांच्या पुढाकाराने हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आले आहे. विशेष म्हणजे, गेल्या १५ वर्षांपासून संतोष जाधव व





त्यांच्या संपूर्ण परिवाराच्या वतीने मुक्ताई पालखीतील वारकऱ्यांची निस्वार्थ भावनेने सेवा केली जात असून, ही सेवेची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली आहे. शिबिरामध्ये वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी, आवश्यक औषधोपचार तसेच तातडीची वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात अली आहे.

वारकरी सेवेलाच ईश्वरसेवा मानत राबविण्यात येणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरले असून, शेकडो वारकऱ्यांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घेतला यावेळी जिल्हा रुग्णालय येथील डॉ.नालपे, डॉ. श्यामसुंदर जोशी, डॉ. रमेश गुंजाळ, डॉ.स्नेहल गोसावी, डॉ.पद्मश्री जोशी,आंधळे मॅडम,घरत मॅडम यांनी आरोग्य तपासणी केली.

व वारकऱ्यांचो सेवा केली या सर्व टीम चे शिवसेनच्या वतीने स्वागत केले ,, या वेळी उपस्तित प्रा लाक्षिमीकांत बाहेंगव्हाण कर सर , शिवसेना तालुका प्रमुख संतोष जाधव बोरफडीचे सरपंच सुनील कुठे ,नितीन दोडके ,राहुल कागदे ,विनोद चव्हाण , पंकज शेळके , बाळू धोत्रे लव्ह धोत्रे सार्थक जाधव व सर्व मित्र परिवार शिवसेना पदाधीकारी उपस्तित होते.

# मोठेवाडी दिंडीचे विठ्ठलनामाच्या गजरात पंढरपूरकडे प्रस्थान

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील काळा हनुमान मंदिर व रोषनपुरी येथील बुवाजी बुआ महाराज मंदिरा पासुन पंढरपूरकडे पायी दिंडीचे रविवारी विठ्ठलनामाच्या जयघोषात प्रस्थान झाले. ह.भ.प.साध्वी वैष्णवीदीदी, ह.भ.प. १००८ महामंडलेश्वर स्वामी मनीषानंद महाराज पुरी आणि ह.भ.प. १००८ मनीष महाराज टाकळगव्हाणकर यांच्या आशीर्वादाने काळा हनुमान मंदिर वारकरी व बुवाजी बुआ महाराज



वारकरी मंडळाने ही दिंडी आयोजित केली आहे.

मोठेवाडी येथून निघालेली ही दिंडी पात्रुड, आंबे वडगाव, धारूर, साळेगाव, हसेगाव आणि कुर्डुवाडी

पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26